## शंभू गणपुले

# मिसळ



# मिसळ

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे.  प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मिसळ

## लेखक - शंभू गणपुले

ई साहित्य प्रतिष्ठान

# मिसळ

लेखक : शंभू गणपुले

"योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क : जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038   020-25384472, 9822439492

jayant.karandikar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.
www. esahitybooks

**प्रकाशन : १२ एप्रिल २०१८**

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

## लेखकाचा परिचय



लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी.ए. , एल.एल.बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या

लेखन,

प्रकाशित लेखन: " ताओ उपनिषद" , कथा-कविता संग्रह -२

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळया संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास: "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492

या पुस्तकातील सर्व मते ही लेखकाची व्यक्तीगत असून त्यांच्याशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. या लेखनाचा हेतू स्वतःचे विचार लिखित स्वरुपात सुस्पष्ट करणे असून त्यातून कोणालाही दुखावण्याचा वा टीका करण्याचा हेतू नाही याची नोंद घ्यावी.

# मिसळ

– शंभू गणपुले

# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.

-- शंभू गणपुले

**मनोगत –**

माझ्या लहानपणी - म्हणजे साधारणपणे चाळीस वर्षांपूर्वी - क्रमिक पुस्तकांबरोबर विद्यार्थ्यांनी इतर साहित्यही वाचावं म्हणून 'गद्य-पद्य-वेचे' नावाचं पुस्तक विद्यार्थ्यांच्या हातात दिलं जायचं. हेतू हा की विद्यार्थ्यांची वाचनाची आवड वाढावी. गद्य-पद्य-वेच्यांनी ते हेतू पुष्कळ अंशी साध्य झाले होते.

१९६८ साली कॉलेज शिक्षणासाठी मी मुंबईला गेलो. कॉलेज प्रवेशाबरोबर, थोरल्या भावाच्या सल्ल्याप्रमाणे, मी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा वर्गणीदार झालो. ते क्षण माझ्या व्यक्तिमत्वाला कलाटणी देणारा ठरला. त्या काळात मी नाथ माधव, हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांपासून सुरुवात करून पुढे अत्रे, खांडेकर, फडके, गदिमा, पु.ल., कुसुमाग्रज, पाडगावकर (शिरवाडकर) आणि इतर अनेक प्रकारचं साहित्य वाचून काढलं. त्याचा परिणाम असा झाला की आपणही असं काहीतरी – कथा, कविता, लेख वगैरे - लिहावं असं वाटायला लागलं.

मनातल्या भावना उत्कट होणं, एखादी कल्पना सुचणं आणि ती कागदावर उतरवणं या स्वतंत्र घटना असतात आणि त्या प्रत्यक्षात उतरवण्यासाठी अंगभूत उपजत गुण आवश्यक असतात याचा अनुभव यायला लागला. १९६८ ते १९७३ ही पाच वर्षं स्वतःचं गाव, कॉलेज आणि नोकरीच्या बदलणाऱ्या जागांच्या संघर्षातच गेली. त्या काळात मनात खळबळणारी कल्पना एखाद्या चिठोऱ्यावर लिहून ठेवावी आणि 'आमच्या सारख्या कनिष्ठ मध्यम वर्गातल्या कुटुंबात असली विचारसरणी योग्य नव्हे' अशा समजुतीने घरातल्याच एखाद्या व्यक्तीने तो कागद फाडून टाकावा असं घडत राहिलं. पण एकोणीसशे त्र्याहत्तर साली मी मुंबईमध्ये स्थिरावलो, मनासारखं झालं आणि माझ्या चाकोरी-बद्ध गुणांना पंख फुटणारी आणि स्वतःजवळ ठेवलेल्या चिठोऱ्या आठवणींना जपून

ठिकाणी पत्नी माझ्या जीवनात आली. सहजीवनाच्या कित्येक वर्षांनंतर तेव्हापासून मी जे जे लिहिलं त्यातल्या प्रकाशित-अप्रकाशित कथा, लेखांचा निवडक संग्रह 'मिसळ'च्या स्वरूपात प्रस्तुत केला आहे.

गद्य-पद्य-वैचारिक हे शीर्षक जरा झालं आहे. नंतर वाचकांना शीर्षक पसंत पडलं वाचकांच्या विचारात असतानाच एका हॉटेलात चाखलेली मिसळ-खाताना हे शीर्षक सुचलं. तिच्यात वेगवेगळ्या मिसळ, थोडीशी गोड, थोडीशी झणझणीत, तिखट पण चवदार अशी आवडेल हीच आशा. वाचकांना मिसळ आवडेल असा विश्वास वाटतो.

# सत्यनारायणाची समाधी

नमस्कार साहेब !

माझ्या आजूबाजूला दुसरं कोणीच नसल्यानं पाठीमागून आलेला आवाज आपल्यालाच उद्‌देशून आहे असं समजून मी चमकून मागं बघितलं.

‘आपण मला नमस्कार केलांत?’ मी त्या व्यक्तीला विचारले.

‘हो आपल्याला!’- तो शांतपणे म्हणाला.

‘अं? हंऽऽ! नमस्कार! माफ करा, पण मी आपल्याला ओळखलं नाही!’

‘कसं ओळखाल? तुम्ही इथं नवीनच बदलून आलां आहांत हें मात्र मी ओळखलं!’- तो हंसून म्हणाला ‘कुठून आलात?’

‘मुंबईहून!’

‘नुसती बदली?’

‘अं हंऽऽ! प्रमोशनवर!’

‘आजच हजर होणार वाटतं? ठीक!’

‘थोरले साहेब आले आहेत. चला त्यांची केबिन दाखवितो तुम्हांला.’ मी त्याच्या पाठोपाठ चालूं लागलों. साहेबांच्या केबिनपाशी आल्यावर परवानगी न घेताच तो आंत गेला. मी बाहेरच थांबलो. त्याचा आवाज मला ऐकू येत होता.

‘नमस्कार साहेब!’

‘नमस्कार! कोण, सत्यनारायण? कां आलास?’

'बाहेर आपल्याला भेटायला आलं आहे कुणीतरी.' तो.

'आंत हांक मार त्यांना.' - जोशीसाहेबांनी त्याला सांगितले.

तो दारांतून बाहेर डोकावला. त्यानं मला आंत येण्याविषयी खूण केली. मी आंत गेलो. मला पाहतांच मॅनेजर जोश्यांनी एकदम हात पुढे केला हस्तांदोलन करीत ते म्हणाले -

'हॅल्लोऽऽ देशपांडे! केंव्हा आलास? बाहेरच उभा राहिलास? सरळ आंत नाही का यायचंस? अरे, आतां तुला कशाला हवी परवानगी? आतां दोन महिने तूच बसणार आहेस ह्या केबिनमधे!' त्यांनी मला बसायला सांगितलं.

ते पुढे म्हणाले, 'देशपांडे, अगदी प्रथम माझ्या हाताखाली होतास तेंव्हांच तूं खूप पुढे जाणार याबद्दल माझी खात्री होती. तुला चांगली संधी चालून आली आहे! कॉग्रॅच्युलेशन्स! यू डिझर्व इट् !'

'थॅंक्यू सर!'मी नम्रपणानं म्हणालो.

'आपण मॅनेजर म्हणून आलांत इथं?' सत्यनारायणानं मोठ्या आश्चर्यानं मला विचारलं.

'हंऽ!' मी म्हणालो.

'सत्यनारायण, हे श्रीधर विनायक देशपांडे!' - मॅनेजर माझी ओळख करून देतां देतां सांगू लागले- 'मी दोन-अडीच महिन्यांच्या रजेवर चाललो आहे. त्या अवधींत हे मॅनेजर म्हणून काम बघतील! मी पुन्हा इथंच येईन कीं नाही कुणास ठाऊक? पण समजा, माझी परस्पर बदली झाली तर माझी खात्री आहे की, देशपांड्यांनाच इथं कायम करतील!'

'देशपांडे साहेब,..... माफ करा हं! मी पहिल्याच भेटींत फार सलगीनं वागलो आपल्याशी' - तो दिलगिरी प्रदर्शित करीत म्हणाला.

'छे! छे! त्यांत माफी कसली मागतां?' मी संकोचून म्हणालो.

'सत्यनारायण, तूं जा आतां!' मॅनेजरनी तुटकपणे सूचना दिली.

'हो! तुमच्या कामांत आता उगीच व्यत्यय नको! मग संध्याकाळी अवश्य या. नव्या साहेबांनापण घेऊन या. बराय् साहब, चलतो!' आणि पुन्हा एकदां नमस्कार करून तो निघून गेला.

'जोशीसाहेब, हा सत्यनारायण कोण?' तो गेल्यावर मी साहेबांना विचारलं.

'ते सगळं मी तुला सांगणारच होतो!' जोशीसाहेबांनी चष्मा काढून समोरच्या टेबलावर ठेवला. ते खुर्चीच्या पाठीला रेलले. फिरत्या खुर्चीवर डाव्या-उजव्या बाजूला असे एक-दोन झोके खाल्ले आणि मग गंभीर होऊन ते मला सांगू लागले-

'याचं नांव गजानन कुलकर्णी. सात-आठ महिन्यांपूर्वी आपल्या ऑफीसांत काम करीत होता. गेली सहा वर्षे तो माझ्या हाताखाली होता. हुशार, कष्टाळू आणि प्रामाणिक होता. सगळ्याशी मिळून मिसळून वागायचा! एक दिवस याची पत्नी आणि दीड-दोन वर्षांचा मुलगा अचानक वारले. हळव्या मनाच्या माणसांना कोणत्याही भावनेची परिसीमा सहन होत नाही. अचानक झालेला दुःखाचा आघात सहन झाला नाही त्याला! आणि तो भ्रमिष्टासारखा वागूं लागला. तरीपण चार महिने मी त्याला कामावर ठेवून घेतला. त्याचं काम मी दुसऱ्यांकडून करवून घेत असे. एक दिवस त्याला काय वाटलं कुणास ठाऊक? तो माझ्या केबिनमध्ये आला आणि म्हणाला -

'साहेब, आपल्याला मी कांही विचारणार आहे!'

'बेशक विचार'- मी.

'साहेब! तुम्ही मला काढून कां टाकत नाही? माझं मन आतां नोकरींत लागत नाही! तरीही तुम्ही मला का पोसताय?'

'कारण ? कारण, आधीच तुझ्यावर आपत्तींचा डोंगर कोसळला आहे! त्यांतच आणखी सांपत्तिक झळ तुला लागावी अशी माझी इच्छा नाही!' मी त्याला हवं असलेलं स्पष्टीकरण केलं.

'साहेब, आपण चार महिने मला सांभाळलंत त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे! पण, माझं धुमसत असलेलं वेड केव्हा पेट घेईल याचा नेम नाही! तसं झालं तर माझ्याबरोबर तुमचीही शोभा होईल. तुम्हांला सगळे लोक मानतात, आणि तुमच्या भिडेखातर माझं काम करतात. पण तुमच्या मागं काय बोलतात याची कल्पना आहे मला. आधारासाठी घेतलेल्या काठीवर एकदम भार टाकून ती मोडून टाकण्याची माझी इच्छा नाही. आपल्या मनांत माझ्या विषयीचा जो सहानुभुतीचा ओलावा आहे तो तसाच कायम ठेवा! यापेक्षां मी आपल्याला काय सांगणार? साहेब, मी वेडा आहे वेडा! मला काढून टाका! काढून टाका मला!! डिसमिस करा...'

'..... असं पुटपुटत तो निघून गेला. पुढे बरेच दिवसांनी त्याची नि माझी रस्त्यांत गांठ पडली. मी प्रथम त्याला ओळखलंच नाही. खूप फरक झाला होता त्याच्यांत! गोऱ्यापान कपाळावरून झुकून डोळ्यांवर येणारी केसांची काळीभोर झुलपं सफाचट् झाली होती. मधल्या सुट्टीसाठी म्हणून घेतलेला डबा आणि थर्मास सांभाळणारे त्याचे हात आज खांद्यावरील उपरणं सांभाळीत होते! वुलनची निळी पँट आणि पांढरा सफेद शर्ट या पेहरावांत, तारुण्य-सुलभ ऐटींत

रस्त्यानं चालणारा गजानन, त्या दिवशीं खालून चटके बसत असूनहि पाय पटापट उचलीत नव्हता. मला त्याची फार कींव आली. मी त्याला थांबवलं आणि विचारलं 'अरे गजानन, कुठं होतास इतके दिवस? कसं काय चाललं आहे?'

'ठेविलें अनन्तें तैसेंचि रहावे, चित्ती असूं द्यावें समाधान!' उत्तरादाखल एक ओवी त्यानं माझ्या तोंडावर भिरकावली. माझ्याकडे पाहून तो क्षीण हंसला.

'हे बघ, कशाची गरज लागली तर बेशक माझ्याकडे ये! मुळींच संकोचू नकोस! हंऽ?' मी त्याला दिलासा दिला. 'जे कां रंजले गांजलें, त्यासि म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा देव तेथेंचि जाणावा।। असं म्हणतात तें कांही खोट नाही! जोशीसाहेब, आपण साधू आहांत! संत आहांत. चलतों मी! आभारी आहे आपला.'

एवढंच बोलून तो निघून गेला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पहात उभा राहिलो. तो पांच-दहा पावलं गेला असेल नसेल तोंच एकाएकीं मागं परतला. जवळ जवळ धांवतच तो माझ्याजवळ आला आणि म्हणाला-'साहेब, गरिबाची एक विनंती आहे! आज माझ्याकडे सत्यनारायणाची पूजा आहे. आपण प्रसादाला यावं अशी इच्छा आहे. वेळांत वेळ काढून अवश्य या!''

इतर कांहीहि न बोलतां तो निघून गेला.

'पुढे ज्या ज्या वेळीं तो मला भेटला त्या त्या वेळी त्यानं मला घरीं येण्याचं-पूजा असेल तर प्रसादाला येण्याचं-निमंत्रण दिलं. एक-दोन वेळां मी गेलोंही. पण दरवेळी जाणं जमलं नाही. आपण गेल्याचं त्याला फार अगत्य आहे असं नाही, किंवा गेलं नाही तरी त्याचा त्याला खेदहि

होत नाही. तो मात्र दरवेळीं न चुकतां निमंत्रण देऊन जातो. त्याच्या डोक्यांत शिरलेल्या सत्यनारायणाच्या पूजेच्या वेडामुळेंच आतां सगळे लोक त्याला 'सत्यनारायण' या नांवानंच हांक मारतात!'

'अशी आहे या सत्यनारायणाची कथा देशपांडे, याबाबत विचार करावयाला तुझा तूं स्वतंत्र आहेस. पण माझी तुला एक विनंती आहे. माझ्या गैरहजेरींत जर तो तुझ्याकडे आला तर आतां मी जसा त्याच्याशी वागलों तसाच तूंहि वाग! त्याची पैशाची अडचण असेल तर दूर कर! त्याचे प डाचे वगैरे पैसे अजून आपल्याकडेच आहेत! तारुण्याच्या ऐन उमेदीत एखादा तरूण असा वायां जाऊ लागला की प ार वाईट वाटतं!! म्हणून तुला ही विनंती करीत आहे!'

एवढं सगळं सांगून झाल्यावर जोशीसाहेबांनी एक दीर्घ उसासा टाकला आणि ते माझ्याकडे पहात राहिले. त्यांनी केलेली विनंती मान्य करण्याच्या रंगांत मी आहे कां नाही याचा अंदाज ते घेत असावेत! त्यांची ती प्रश्नार्थक मुद्रा पाहून मी म्हणालों-

'साहेब, मी आपल्या विनंतीच्या बाहेर नाही! मला शक्य असेल ती सर्व मदत मी करीन.'

'गुड्! हीच अपेक्षा केली होती मी तुझ्याकडून. एक 'कॉन्पि डेन्शल' केस तुझ्या स्वाधीन केली आहे. आतां ऑपि सच्या कामाकडे वळूं!'

वर उल्लेखिलेल्या प्रसंगाच्या दिवशी वार होता गुरुवार! मला सगळ्याच गोष्टी समजून घेऊन ऑपि सचा संपूर्ण चार्ज घ्यायचा होता. त्या सगळ्या नादांत सत्यनारायणकडे जाण्याची आठवण आम्हांला प ार उशीरा झाली. आम्हीं दोघंही अगदी थकून गेलो होतो. त्यामुळं उशीरा कां

होईना पण जाण्याची इच्छा असूनही आमचे पाय तिकडे वळले नाहीत. शेवटी न जाण्याचा निर्णय घेऊन, जोशीसाहेब आपल्या बंगल्यावर आणि मी माझ्या लॉजकडे चालते झालो.

पुढे दोन दिवसही तशाच गडबडींत गेले. शनिवारी मी ऑफ्रोसचा संपूर्ण चार्ज घेतला. रविवारी सकाळच्या गाडीनं जोशीसाहेब मुंबईस रवाना होणार होते. त्यांना पोहोचवायला मी स्टेशनावर गेलो. परत येताना काही किरकोळ खरेदीसाठी मी बाजारपेठेतून येत असतांनाच सत्यनारायणानं मला गाठलं!

‘नमस्कार साहेब!’- तो.

‘नमस्कार सत्यनारायण!’ - मी.

‘साहेब, आपण आलां नाही त्या दिवशी?’- त्यानं एकदम मुद्यालाच हात घातला.

‘त्याचं असं झालं......’ मी पूर्ण बोलायच्या आधीच त्यानं सुरुवात केली.

‘त्याचं असं झालं की, त्या दिवशीं वेळच मिळाला नाही! असंच ना? शिवाय तुम्ही येथे नवीन आलेले. सगळ्या गोष्टी समजावून घ्यायला हव्यात. ठीक आहे!’ येणं झालं नाही. योगायोगाच्या गोष्टी आहेत ह्या सगळ्या!’

‘शिवाय मला घरही ठाऊक नव्हतं, एकटा येईन म्हटलं तर!’ मी माझ्या म्हणण्याला आणखी एका कारणाची पुष्टी दिली.

‘साहेब, आत्तां येतां माझ्याबरोबर? घर दाखवून ठेवतो. आत्तां नाही म्हणूं नका!’ त्यानं माझ्यापुढे हात जोडले आणि अगदी कळकळीनं बोलला.

त्याची विनंती अमान्य करण्याला माझ्याजवळ सबळ असं कांहीच कारण  नव्हतं. मी मुकाट्यानं त्याच्या मागोमाग चालूं लागलो. दीड एक फर्लांगावर त्याचं घर होतं. घर म्हणजे काय? एका वाड्यांत दोन खोल्यांचा एक ब्लॉक होता. आम्ही दोघं वाड्याच्या दारांतून आंत शिरतांच वाड्यांतल्याच दोन-चार लहान मुलांनी 'नमस्कार सत्यनारायण' म्हणून त्याला नमस्कार केला. त्या मुलांपैकी दोघं तर त्याच्या हातालाच लोंबकळली! त्या सर्वांकडं बघून सत्यनारायण एकदां प्रसन्न मुद्रेनं हसला आणि मग त्यानं मुलांच्या नमस्काराला प्रति-उत्तर म्हणून त्यांच्या डोक्यांवर हात ठेवला, आणि 'आयुष्यमान भव' असा घवघवीत आशीर्वाद दिला. शर्टच्या खिशांतून त्यानं एक कागदाची पुडी काढली. त्यांतील एक एक मनुका व खडीसाखरेचा एक एक खडा त्यानं प्रत्येकाच्या हातावर टाकला. एका मुलाच्या डोक्यावरून हात फिरवतां फिरवतां तो मला म्हणाला- 'साहेब, मुलं म्हणजे साक्षात् निर्मळपणा! देवाची जिवंत प्रतिकेंच! त्यांच्याजवळ शहाणा आणि वेडा हा भेद कुठून असणार?'   आणि तो नेहमीसारखा क्षीण हंसला! त्यांतील व्यंजकतेची आणि उपहासाची छटा मला मात्र चाटून गेली!

'चला साहेब, आंत जाऊया! बच्चे कंपनी, आतां माझ्याकडे पाहुणे आलेत. ते जाईपर्यंत आंत येऊन दंगा करावयाचा नाही हं कुणी! चला साहेब!'

त्यानं मला त्याच्या ब्लॉककडे नेलं. दाराला नुसती कडी घातली होती. कुलूप बिलूप कांही नाही! कडी काढतां काढतां तो म्हणाला -

'हें विश्वचि माझें घर! कुठं कुठं कुलपं लावूं? आणि कुणाकुणाला मनाई करूं? शिवाय घेऊन जाण्यासारखं आहेच काय या घरांत? समजा, आहे ते नेलं कुणी? नेऊ द्या. मला एकट्याला असं काय लागणार आहे?'

तो बोलत होता. मी गप्प होतों. अगदी गप्प! माझं मन सारखं विचार करीत होतं. हा खराच भ्रमिष्ट आहे कां? माझ्या मनांत येतील अशा शंकांच तो आपणहूनच निरसन करीत होता. हे सगळं बोलत होता तें वेडाच्या भरांत की मुद्दाम खोचकपणे? त्याबाबत माझ्या मनाचा निर्णय होईना! आम्ही घरांत गेलो. तेथील स्वच्छता आणि टापटीप माझ्या नजरेंत भरली. त्रस्थाला तर नक्कीच वाटलं असतं की, गृहलक्ष्मीचा हात सारखा फिरत असावा म्हणून!

'अरेऽव्वा! सत्यनारायण फारच व्यवस्थित ठेवलं आहेस घर!'

'हंऽऽऽ' त्यानं एक लांब सुस्कारा टाकला आणि म्हणाला, 'शिस्त मोडणारं आहेच कोण घरांत? आमचं काय? वेडाची तंद्री लागली एकदां की बसतो झालं घासत पुसत! आतां जन्मभर असंच चालायचं ..... असंच चालायचं.....! अरे? साहेब, आपण उभे कां? बसा ना? आपण काय घेणार? चहा? कॉफी? आधीच उरकूं तो कार्यक्रम, म्हणजे गप्पा मारतां मारतां मध्येच उठायला नको!'

'हे बघ, मला कांहीच नको! एक गुळाचा खडा आणि चांगलं थंडगार पाणी घे एक तांब्याभर!'- मी त्याला सांगितलं.

'गुळाचा खडा? हॅऽऽ हॅँऽऽहॅँऽऽ! छान! एकदम पसंत! जुन्या विचाराचा नवा साहेब! ' हॅऽऽऽ हॅँ;हॅँ;ऽऽऽ!' मग मीही त्याच्या हंसण्यांत सामील झालो.

त्यानं गार पाण्याचा तांब्या आणि एका वाटींत गुळाचा खडा आणून माझ्यापुढं ठेवला. तो माझ्या समोर खुर्चीवर बसला. बराच वेळ कुणीच कांही बोललं नाही. त्याच्या गत जीवनाविषयी माझ्या मनांत जिज्ञासा निर्माण झाली होती. त्या अनुषंगानं मग मीच बोलण्याला सुरुवात केली. 'सत्यनारायण, तुझी हरकत नसेल तर तुला एक प्रश्न विचारणार आहे. विचारुं?'

'हं! विचारा!'- तो म्हणाला.

'जोशीसाहेबांची तुझ्यावर प ार मर्जी होती! तुझ्याबद्दल खूप वाटायचं त्यांना. असं असून आणि ते तुला सांभाळायला तयार असूनही तूं आपणहून नोकरी कां सोडलीस? जोशीसाहेबांनी मला साधारण कल्पना दिली आहे. पण त्याबद्दल मी असं म्हणूं शकेन की, मानवी मनाची घडणच अशी असते की, केवढंही दुःख असो, जसजसा काळ लोटत जाईल तसतसं ते कमी होत जातं! त्याचा हळुंहळुं विसर पडतो! कदाचित् क्षणभर विचलित झालेली तुझी बुद्धि स्थिरावली असती! आणि....'

मला मध्येंच थांबवून तो म्हणाला -

'पण बुद्धि स्थिरावलीच असती असा निर्वाळा देतां येणार होता कां? आणि सगळी खटपट कुणासाठी करावयाची? स्वतःसाठी? दीड वितीच्या या खळगीसाठी? देशपांडेसाहेब, दुःखातिरेकानं वेड लागण्याइतका मी कांही कच्च्या दिलाचा नव्हतो! एक गोष्ट साध्य करायची म्हणजे दुसऱ्या कशावर तरी पाणी सोडावंच लागतं! मला हवं ते साध्य करण्यासाठी, नोकरी सोडणं भाग होतं मला'- तो.

'पण अशी दुसरी कोणती गोष्ट तूं साध्य केलीस?' मी

'मृत्यु! मृत्यूला जवळ आणलंय मी!!' तो दृढ आवाजांत म्हणाला.

'काय? मृत्यु?'- मी आश्चर्यानं त्याला विचारलं.

'होय! ज्या भगवान् सत्यनारायणानं माझ्या पत्नीला आणि मुलाला जवळ केलं, तो मला असं किती दिवस दूर लोटील? एक दिवस तो मलाही जवळ करील! नव्हे, त्याला तसं करणं भाग पडेल!!'

माझ्या अंगभर भितीचा काटा उभा रहात होता. तो अगदी मख्खासारखा, पण निश्चयानं बोलत होता. मृत्यूबद्दल बोलतांनाही त्याच्या आवाजाला जरासुद्धा कंप सुटला नाही. मी त्याला म्हणालो.

'सत्यनारायण, मी तुझ्या म्हणण्याचा अर्थ समजलो नाही.'

'इतिहास-जमा गोष्टींचा अन्वय लावल्याशिवाय त्याचा अर्थ समजणारच नाही! तरीपण अर्थ उघड आहे! एक ना एक दिवस भगवान् सत्यनारायणाला मला घेऊन जाणं भाग पडेल! इतके दिवस मी त्याच्या इच्छेप्रमाणें वागलो! आता त्याला माझ्या इच्छेप्रमाणे वागावं लागेल!! आजवर फार सोसलं मी. माझी कहाणी ऐकायची असेल तर पत्थराचं काळीज हवं!'

तो बोलूं लागला. शून्यांत बघून! एकटक नजरेनं! मधूनमधून आवंढे गिळीत! कधी नव्हें ते आज त्यानं तोंड उघडलं होतं.

'लहानपणापासून एकलकोंडेपणानं दिवस काढलेत मी! अगदी जन्मल्यापासून - त्या क्षणापासून मी एकटा आहे! मला जन्म दिल्याक्षणींच माझी आई वारली असं लोक म्हणतात. खरंहि असेल! कारण 'आपल्या अपत्याचे केवळ कल्याण इच्छिणारी व्यक्ति म्हणजे आई' या

व्याख्येशिवाय आईविषयी मला कांऽही माहीत नाही. वडिलांच्या अस्थिर सांपत्तिक परिस्थितीमुळे एक वर्ष मामाकडे, तर एक वर्ष आत्याकड, तर एक वर्ष वडिलांबरोबर अशी त्रिस्थळी यात्रा करीत मी बालपणींची वर्षे काढली. परिस्थिती माणसाला शहाणं करीत असते! मीही तसाच शहाणा झालो. मॅट्रिकपर्यंत चांगला पास होत गेलो. मॅट्रिक झाल्यावर आपल्या कंपनीत जोशीसाहेबांच्या हाताखाली लागलों. आयुष्यांत प्रथमच एका सज्जन माणसाशी माझी गांठ पडत होती! मला त्यांचं मार्गदर्शन मिळालं. यथाक्रम मी बी.ए. झालो. माझ्या कष्टाचं चीज केलं जोशीसाहेबांनी! दरम्यान 'स्थळ' या दृष्टीनंही मी चांगला 'क्वालिफाईड' झालो होतो! चांगली नोकरी, बी.ए. पर्यंत शिक्षण, रूपानं बरा आणि मुख्य मागं-पुढं भावंड नाही! अर्थात् जबाबदाऱ्याहि नाहीतच! आणि मग पत्नीच्या नात्यानं आणखी एका चांगल्या स्वभावाच्या आणि प्रेमळ व्यक्तीशी माझा संबंध आला....'

सांगतां सांगता सत्यनारायण क्षणभर थांबला. एकाजागी स्थिर केलेले त्याचे डोळे थोडे चाळवले गेले. त्यांची त्यानं एक-दोनदा उघडझाप केली. तो, खुर्चीच्या उजव्या हातावर आपलं डावं कोपर टेकवून थोडासा डाव्या बाजूला झुकला आणि पुन्हा बोलू लागला.....

'माझ्या जीवनांत संपूर्ण परिवर्तन झालं. बघेल त्याला हेवा वाटावा असं गृहस्थाश्रमी जीवन जगायला मी सुरुवात केली. त्यांतच भर म्हणून माझा चिमणाबाळ जन्मास आला. आम्हां दोघांच्या सुखाला पारावर उरला नाही! माझ्या संसारात सुख अगदी काठोकाठ भरून शिवाय वर ओसंडू लागलं! एक दिवस अचानक या ओसंडत्या सुखाबरोबरच माझी पत्नी आणि माझा बाळ खालीं सांडले! माझा संसार कोरडा ठणठणीत झाला. मी एकटा पडलों.....! अगदी एकटा!!'

'तो दिवस पौर्णिमेचा होता. माहेरी गेलेली बायको रात्री परत येणार होती. मी मिळवता झाल्यापासून दर पौर्णिमेला करावयाची सत्यनारायणाची पूजा मी कधी चुकवली नव्हती. त्या दिवशीहि बायको घरी नव्हती तरी मी सकाळींच पूजा उरकून घेतली. रात्रीं ११।। वाजतां मी त्या दोघांना स्टेशनवरून घेऊन आलो. बाळ अगदी गाढ झोपला होता. आम्ही झोपायला जायच्या आधी मी पत्नीला आठवण केली. म्हटलं, देवापाशी तीर्थ आहे भांड्यांत! तूं घे अन् बाळाच्याहि तोडात घाल एक पळीभर! ती देवघरांत गेली. बारीक करून ठेवलेल्या समईच्या मिणमिणत्या प्रकाशांत तिनं दोन पळ्या तीर्थ स्वतः घेतलं आणि एक पळी तीर्थ बाळाच्या तोंडांत घातलं! देशपांडे साहेब, काय सांगू तुम्हांला.... '

'अकाल मृत्यू हरणं, सर्व व्याधी विनाशनम्' असं म्हणून प्राशन केलेले सत्यनारायणाच्या पायाचं ते तीर्थ पोटांत जातांच वीष झालं वीष!! अकाली येणाऱ्या परतवण्यांऐवजी तें तीर्थ मृत्यूला बरोबर घेऊन आलं! रात्रीच्या वेळी निद्रेच्या स्वाधीन झालेले, माझ्या जीवाच्या तुकड्यांपेक्षांहि कोमल आणि मला प्रिय असलेले, ते दोन जीव पुन्हा जागे झालेच नाहींत! पुन्हा म्हणून माझ्या बाळानं माझ्याकडे डोळे उघडून पाहिलं नाही....'

सत्यनारायण अगदी गद्‌गदून रडू लागला! मलाहि माझी आसवं आवरणं कठीण झालं! पण सत्यनारायण रडतां रडतां एकदम थांबला! क्षणापूर्वी डोळ्यांतून अखंड वाहणारे पाणी एकाएकी पापणीवरच थबकले!! सत्यनारायण एकटक नजरेनं समोरच्या भिंतीकडे पहात राहिला. मी भिंतीकडे नजर वळविली, तेव्हा एक पाल एका चिलटामागून सरसर खालीं येत असलेली दिसली, सत्यनारायण तिरीमिरी आल्यासारखा उठला, त्यानं कोपऱ्यांतली चप्पल उचलली आणि

'चांडाळणी, माझा संसार उजाड केलास तरी तुझं समाधान झालं नाही? हें घे तुझ्या पापाचं प्रायश्चित्त' असं म्हणून त्यान एकाच फटक्यांत पालीला उताणी पाडली! पाय आणि शेपटी झाडणाऱ्या पालीकडे पहात पहात तो खुर्चीवर येऊन बसला आणि म्हणाला-

'सत्यनारायणाच्या पायाच्या तीर्थाचं विष करणारी हीच ती चांडाळीण! ही नाहींतर हिची काकी-मामी असेल कुणी! आता सांगा साहेब, या सर्व प्रकारानंतर काय उरलं माझ्या जीवनांत? परमेश्वरानं मला सगळं दिलं! पण अल्पावधींतच ते हिरावूनहि घेतलंन्! आतां फक्त एकच गोष्ट अशी उरली आहे कीं, जी दिल्यावर परमेश्वर ती लगेच 'वापस' मागणार नाही! आणि ती म्हणजे मृत्यू! होय! मृत्यू!! मृत्यूशिवाय मी काय मागूं परमेश्वराजवळ? त्याचसाठी अजूनहि भगवान् सत्यनारायणाची आराधना आणि पूजा चालूं आहे! एक दिवस तो मला घेऊन जाईल! तसं करणं त्याला भाग पडेल!'

तो गप्प झाला. आणि विचारमग्न अवस्थेत शून्यांत बघत राहिला. मी अवाक् होऊन त्याच्याकडे पहात राहिलो! माझ्यासुद्धां भावना इतक्या चाळवल्या गेल्या होत्या, आणि माझ्या मनावर इतका ताण पडला होता की, त्याच्या सान्निध्यांत रहाणं मला अशक्य वाटूं लागलं! मी गडबडीत त्याचा निरोप घेतला आणि बाहेर पडलो.

***

पुढे जवळ जवळ दोन महिने त्याची नि माझी गांठ पडली नाही. एकदां मी त्याच्याकडे जाऊन आलो, पण त्यावेळी तो घरी  नव्हता. तो ऑफिसकडेहि फिरकला नाही. पण दोन महिन्यानंतरच्या पौर्णिमेच्या दिवशीं प्रसादाला निमंत्रण द्यावयाला आला.

'नमस्कार साहेब!'

'नमस्कार! कोण सत्यनारायण? कां आलास?' मी.

'थेट जोशीसाहेबांच्यासारखं विचारलंत्! छान्! मी आपल्याला निमंत्रण द्यायला आलो आहे. आज निर्वाणपूजा आहे! तेव्हा प्रसादाला अवश्य यायचं ! न विसरतां!'

'निर्वाण पूजा? म्हणजे?' मी चमकून विचारलं.

'म्हणजे शेवटली पूजा! अगदी शेवटची! बराय तुमचा जास्त वेळ घेत नाहीं!'

आणि माझं कांही न ऐकतां तो निघून देखील गेला! संध्याकाळी मी त्याच्याकडे गेलो. सात-साडसातची वेळ होती! वाड्यांत नेहमींप्रमाणे पोरांचा दंगा सुरुं होता. मी सत्यनारायणाच्या ब्लॉककडे वळलों. दार उघड होतं. आंत पाऊल टाकतांच कापूर आणि उदबत्त्या यांचा संमिश्र घमघमाट आला. मन प्रसन्न झालं अगदी! बाहेरच्या खोलींतूनच मी डोकावून पाहिलं. सत्यनारायण पूजेच्या चौरंगापुढे पद्मासन घालन ध्यानस्थ बसला होता! देवाचं चिंतन करीत होता! प्रार्थना-मानसपूजा-संपल्यावर तो उठून प्रसाद देईल अशा विचारानं मी बाहेर बसून राहिलो. पण अर्धा तास झाला तरी त्याची तंद्री उतरेना. मला बसावयाला जास्त वेळ नव्हता. मी बूट बाहेर काढून ठेऊन आंत आलो. नाना रंगाच्या सुवासिक फुलांनी सजवलेला चौरंग, चार कोपऱ्याला बांधलेले कर्दळीचे खुंट, दोहोंबाजूला पांच पांच वातींनी तेवणाऱ्या समया, पुढल्या बाजूला

अग्रपूजेचा पुजलेला गणपती, त्याच्या शेजारचे दक्षिणेचे विडे व सुपाऱ्या, निरांजन, आणि जळतां जळतां संपत आलेल्या उदबत्त्या आणि कापूर आरती आणि या सर्वांपुढे, गुलाबी सोवळं नेसून ध्यानस्थ बसलेला शांत आणि गंभीर मुद्रेचा सत्यनारायण! सगळं दृश्य इतकं मनोहर होतं की, श्रद्धाळू माणसाच्या अंतर्मनाला त्यानं खास हेलावूंन टाकलं असतं. मी सत्यनारायणाला हळूंच हांक मारली.

'सत्यनारायण! ए, सत्यनारायण!'

पण तो हलला नाही. बोलला नाही. आत्मानंदांत निमग्न झाला होता जणुं! त्याच्या चेहऱ्यावरची प्रसन्न शांति रेसभरहि ढळली नाही. त्याला हलवून जागं करावं अशा इराद्यानं मी त्याच्या उजव्या बाजूला थोडासा पुढं झालो. त्याला पुन्हा हांक मारणार तेवढ्यांत मी सहज बघितलं चौरंगाच्या खुराशीं एका द्रोणांत प्रसादाची मूद आणि नैवेद्याच्या वाटींत थोडं तीर्थ होतं, बाजूला काढून ठेवलेलं! तीर्थावर विडयाचं पान झांकण म्हणून घालावयाला तो विसरला! पण हे त्यानं कुणासाठी बाजूला काढून ठेवलं असावं? माझ्यासाठी तर नव्हे? पण मला यायला इतका उशीर झाला होता कां? हा विचार माझ्या डोक्यांत आला मात्र आणि मग मला राहवेना मी त्याच्या खांद्याला दोन बोटांनी थोडसं हलवलं! पण तो हलला नाही. बोलला नाही. त्याचा चेहरा होता तसाच निर्विकार, गंभीर आणि शांत राहिला. एवढ्यांत त्याचा उजवा हात थोडासा हलला. मला वाटलं आतां जागा होणार म्हणून मी त्याला हांक मारली पुन्हा

'सत्यनारायण! ए! हें बघ मी आलोंय् प्रसादाला'- मी त्याच्या खांद्याला पुन्हां स्पर्श केला. आणि ......

... आणि मला समजून चुकलं की, मला यायला फार उशीर झाला होता. मी त्याला हलवतांच पद्मासनाच्या वेळी 'मुद्रा' करून मांडीवर ठेवलेला त्याला हात निर्जीवपणे खालीं घसरला. गजानन सत्यनारायणाच्या रूपांत विलीन झाला होता. परमेश्वरी इच्छा आणि मानवाची अढळ श्रद्धा यांचा संगम झाला होता! सत्यनारायण समाधिस्त झाला होता!!

* * *

# बैलोबाचे मृत्युपत्र

माझं गांव म्हणजे एक तालुक्याचं ठिकाण आहे. एकेकाळी मागासलेलं; पण आता पुढारलेलं! तें कशामुळं पुढं आलं हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे, कारण श्रेयनामावलींत वर येण्यासाठी अनेक व्यक्तींची आणि संस्थांची स्पर्धा चालू असते. या गर्दीत सगळ्या प्रकारच्या माणसांची भरताड आहे. कांही काम करून टिमकी वाजवणारे आहेत; कांही टिमकी वाजवून मग काम करणारे आहेत; कांही नुसतीच टिमकी वाजवणारे आहेत; पण नुसतं काम करणारा मात्र कुणीही नाही. उगीच कुठं धरपकड व्हावी; कुणाला तरी चार दोन तास ठाण्यावर बसवून ठेवलं जावं आणि तेवढ्या भांडवलावर त्यानं देशभक्त म्हणून मिरवावं असा प्रकार माझ्या गांवांत अनेक वेळा घडला आहे आणि पुढंहि घडत राहील. कारण माझ्या गांवाला देशभक्तीची एक आगळीच बूज आहे. अनेक देशभक्त या गांवाच्या अंगाखांद्यावर स्वच्छंदपणे नाचलेत बागडलेत! वरील प्रकारे अर्ध्या हळकुंडानं पिवळ्या झालेल्या देशभक्तांचा सोनरी भविष्यकाळ पाहून काळेनिळे पडणारे असंतुष्ट आत्मेहि या गर्दीत आहेत. आपली प्रसिद्धी आणि पर्यायानं जनतेची सेवा व्हावी या दृष्टीनं माझ्या गांवांत नित्य नवे प्रयोग करण्याकडे आपली बुद्धि खर्ची टाकण्यांत माणसामाणसांत जणूं स्पर्धा लागलेली असते!

अर्ध्या हळकुंडानं पिवळ्या झालेल्या अशाच एका देशभक्तानं आपलं स्तोम वाढवण्यासाठी जो एक 'अभिनव' प्रयोग केला तो मराठी वाचकांच्या मनोरंजनार्थ आज पुढे मांडीत आहे. हे एका पंचायत समितीच्या अध्यक्षांचं मृत्युपत्र आहे. त्यांत त्यांनी शेवटी असं

लिहिलं होतं कीं 'या मुर्त्यू-पत्तराची सुद्द म्हराटोत कापी-राइट करन्याविशयी म्या माज्या सेक्रेटरीला सांगितलं हाय त्यामागला मुद्याचा पाईंट बी ह्योच हाय कीं आमच्यासारक्या आडग्या मानसाची भाषा उगं प्येकार्डाला न व्हावी' दुर्दैवानं त्या 'मृत्यपत्तराची' शुद्ध मराठी प्रत तयार व्हावयाच्या आधीच तें आम्हांला, एका लखोट्यांत, रस्त्यावर पडलेल्या स्थितींत, सापडलं. त्याच्यासोबत सेक्रेटरीला लिहिलेली चिठ्ठी आहे. मूळ लेखकाच्या शेवटच्या इच्छेला मान देऊन आम्हींच तें पत्र शुद्ध व्यवहारी भाषेंत रसिकांच्या पुढे मांडतो आहोत. हें शुद्धीकरण व्यवहारी भाषेंत रसिकांच्या पुढे मांडतो आहोत. हे शुद्धीकरण करतांना लेखकाच्या भावनेशी जितकं समरस होतां येईल तितकं होण्याचा प्रयत्न केला आहे. जिथं असा प्रयत्न पसेल असं वाटलं तिथं आणि लेखकाच्या कांही विशिष्ट भावना सांभाळण्यासाठी कांही ठिकाणीं लेखकाची वाक्यं जशींच्या तशी वापरली आहेत. असो. मृत्युपत्र प्रस्तुत आहे.

'ह्यो काळ मायंदाळ हाय'! ह्या काळाच्या उदरांत अनेक गोष्टी गडप झाल्या आहेत. मोठे मोठे राजे आणि त्यांची साम्राज्यं गडप झाली आहेत. आपले प,डारी गडप झाले आहेत. अहो, आमच्या सारख्यांच्या डोळ्यांदेखत धान्याची कोठारंच्या कोठारं गडप होतात तिथं माणसासारख्या 'इतभर' जिवाची हो काय कथा? यम हाहि एक मोठ्ठा साठेबाज आहे. वेळ भरली आहे, असं वाटलं की 'त्यो वळतोच माणसाची मोटळी! मंग त्यो ह्ये पघत न्हाई की त्यो मानूस इरोधी पक्षाचा हाय का पावरमधल्या पक्षाचा हाय!' इतका विचार करायला त्याला कुठला आला आहे वेळ? कुणाला कधी उचलायचं त्याचं 'यमराज प्लॅनिंग' कामराज योजनेप्रमाणं अगुदरच तयार असतं जणूं!!'

'ह्ये समदं यमराजानं जनू कानांत सांगिटल्या परमानं येका सौंस्क्रुतकारानं लिवलया किं 'यम आपले केस धरून बसला आहे असं समजून माणसानं धरमाला धरून वागावं!' अवं कसला धरम् आन् कसलं करम्? त्ये समदं थ्वोतांड!!' आता तुम्हीच सांगा, यम कुणाकुणाचे म्हणून केंस धरील? तुमचे धरील; माझे धरील; हज्जारांचे धरील!! पण जगांतल्या सगळ्या माणसांचे आणि तेहि एकाच वेळी कसे धरील? तो फक्त 'सिरियास' मानसांचेच केस धरणार! 'यमानं मानसाचं क्यास धरलं रं धरलं की, तसांच त्याला 'सीरियास् क्यास' म्हनत्यात!!' पण मनुष्य केव्हां एकदम सीरियस् पडेल तें सांगतां येत नाही. म्हणून तेवढ्यापुरता माणसानं धर्म करावा. तो धर्म म्हणजे येशु ख्रिस्तानं, गौतमबुद्धानं आणि आपल्या बापूजींनी सांगितलेला माणसुकीचा धर्म होय! माझ्या परीनं मो त्या धर्माचं पालन केलं! मी शेजाऱ्यावर प्रेम केलं. माझ्या घरच्या गोरगरिबांचे अश्रू पुसले. त्यावेळी ती सगळी मंडळी दलितच होती. म्हणून त्यांच्या उद्धारासाठी झटलो. 'म्या इचार केला की, माझ्या घरच्या दलितांची आसवं पुसन्याचा चान्स दुसऱ्या कुना समाज शेवकाला देन्या बिगर आपलं काम आपुनच स्वावलंबनानं केलेलं बरं!' यम आज येईल, उद्यां येईल म्हणून मानवी मूल्यांची जोपासना केली. पण यम कांही आला नाही. पण सांगतां येत नाही केव्हा एकदम गप्‌कन् डोळे मिटतील तें!

यम केस धरून बसला म्हणून माणसानं जसं धर्माचरण करावं त्याप्रमाणेच त्यानं आपलं मृत्यु-पत्रहि करून ठेवावं! डोक्याकडून गुडघ्यापर्यंत कर्जाच्या चिखलांत रुतलेल्या माणसाला तशी कांही जरूर नाही म्हणा. पण समजा, त्यालाही वाटलं की, दोन चार गोष्टी लिहून ठेवाव्यात तर त्यालाही कसली हरकत नसल्याचं मी जाहीर करतों!!

हाच एक .... एक.... आपलं.... तें काय तें? हंऽऽ! मुद्यांचा पॉईंट डोळ्यासमोर ठेवून मी आज मृत्यु-पत्र लिहायला बसलो आहे. हे लिहिताना सर्व गोष्टी ध्यानांत घेवून आणि एका गोष्टीची दुसऱ्या गोष्टीला चाट बसणार नाही याची खबरदारी घेऊन लिहिणं होत असल्यानं हें जरा लांबड लागत जाणारं पत्र होणार आहे. मी आज मेलों किंवा दहा-वीस वर्षानं मेलों तरी या पत्रांत फेर-दुरुस्ती करण्याची जरूर पडणार नाही. सेक्रेटरीला मी तसं सांगून ठेवलंच आहे. पण ती गोष्ट मी इथंहि जाहीर करतों. माझ्या ह्या मृत्युपत्रावर माझ्यामागं झक्काझक्की होऊ नये एवढ्याच हेतूनं इथवंर ही 'ष्टारी' स्पष्ट केली.

'म्या आजमित्तिला पंचात शिमितीचा परशिडेंट हाय्. माज्या पच्चात् माज्या इस्टेटीची जी काय वेवस्था करावी म्हनून लिवलं हाय ती माजी स्वोत्ताची कमाई असून त्यात वडिलोपार्जित येक तनसडी (काडी) बी न्हाई!' माझीं खटावला एक, कोरेगांवला दोन आणि ऐतवड्याला एक अशी बाराबारा खणी चार घरं आहेत. म्हणजे एकूण अठ्ठेचाळीस खण बांधीव जागा आहे. ह्या चार घरांपैकी एक एक घर माझ्या चार मुलांना चिठ्या टाकून वाटून देण्यांत यावीत. 'म्हंजी भडवी भांडान् करनार न्हाईत.' ह्या उप्पर जर भांडणं लागलीं तर प्रत्येकाला प्रत्येक घरांत तीन तीन खण जागा द्यावी. मग खुशाल ह्या गांवाहून त्या गांवाला चकरा मारत बसूं द्यात.

मी ह्या समाजसेवा करण्याच्या धंद्यांत.... नव्हेऽऽ ... आपलं तें काय तेंऽऽ? हांऽऽ तर राजकारणांत पडल्यापासून शेतीवाडीकडं पाहिजे तेवढं ध्यान देता आलं नाही. त्यामुळं ह्या घटकेला जमिनजुमल्याचं नंबरवार वाटप करतां येणार नाही. म्हणून तूर्त मी एवढंच जाहीर करतों की, 'ज्या टायमाला ह्ये मुर्त्यु-पत्तर फोर्समंदि ईल त्या टायमाला माझ्यासाठी कुनीतरी सात बाराचं उतारं काढून घ्यावेत आन् त्यातली जिराईत आन् बागाईत शेपरेट करून शान एकूण

जिमीन चारीबी पोरामंदी सारक्या हिश्शानं वाटून द्यावी.' ह्याखेरीज शेअर्सवरचा नफा, मी ज्या ज्या सोसायट्यांत चेअरमन आहे त्यांच्या कारभारांतला दरसाल हिस्सा आणि 'ब्यकिंतला' नगद पैका माझ्या कारभारणीला देण्यांत यावा. ही व्यवस्था माझी कारभारीण माझ्या अगोदर 'दुमडली' नाही तरची आहे. ती जर त्यावेळी हयात नसेल तर तिचा हिस्सा पुनः चारहि मुलांत सारक्या रकमेनं वाटून द्यावा.

'इथवर म्यां माज्या आज-तागायतच्या स्थावर आणि जंगम इस्टेटीचा रिपोट दिला. माझं ह्याफ्‌डं जें काई आयुक्ष शिलकीत असेल त्या टायमांत जमा झालेला पैका, माज्या जीवणावर आत्मचरित्र लिहिन्यास कुनी शाना होतकरू समाज शेवक म्होरं आला तर त्याला देन्यात यावा.'

माझा आदा आणि खर्च यांची तोंडमिळवणी करतां करतां माझी आजवर कुत्तरओढ झाली. त्यामुळं मीं वर माझ्या मिळकतीची केलेली व्यवस्था म्हणजे माझ्या पडत्या काळांत मला ज्यांनी प्रेमाची साथ दिली त्यांचं थोडकं उतराई होण्यांतलाच एक भाग आहे. तेव्हां हे नैतिक देगार देऊन टाकल्यावर जें कांही उरतं तें माझं स्वतःचं असं समजून त्याचा विधायक कार्यांकडं उपयोग करावा. 'त्येची जिम्मेदारी त्यावेळच्या शिमीतीच्या परशिडेंटवर ऱ्हाईल. मंग त्या रकमेचा उपेग इहीर (विहीर) खनन्याकडं करावा किंवा इरोधी पक्शाची पाळंमुळं खनन्याकडं करावा. जो काई डिशीजण घेन्यांत ईल त्याला माजा इरोध नसल्याचं म्यां आत्ताच वोटिंग करतो; कारन त्या टायमाला मी नसणार!'

इथवर मी माझ्या आजतागायतच्या आणि यापुढं जमणाऱ्या इस्टेटीचा रिपाट दिला. आता माझा म्हणून कांही एक विचार आहे, तो लिहितों. हा विचार अमलांत आणण्यासाठी पंचात

समितीनं व्यवस्था करावी आणि त्यासाठी जो काय खर्च येईल त्याचं व्हाऊचर करून चारी भावाभावांनी पेमेंट करावं. ही व्यवस्था पुढीलप्रमाणे -

मी कुठंही मेलों तरी माझा मडदा येष्टीतून कोरेगावला म्हंजी माझ्या वतनाच्या गावाला नेण्यांत यावा. त्यानंतर स्मशान यात्रेसाठी सगळ्या लोक्यालिटींत नोटिसा पाठवाव्यात. मी त्यावेळी 'स्टेटला' किंवा 'सेंटरला' असलों तर तशी कांही जरूर पडणार नाही. नंतर माझ्यावर अंत्यसंस्कार करावा. ह्यांत दुसरातिसरा कांही उद्देश नसून माझ्या मागं रहाणाऱ्या लोकांच्या भावना सांभाळायच्या एवढा एकच हेतू आहे.

भय वाटूं नये म्हणून अस्वलाचे केस चांदीच्या पेटींत घालून तो ताईत जसा लहान मुलाच्या गळ्यांत घालतात त्या प्रमाणं माझ्या डोक्यावरचे केस काढून आणि पेट्यांत घालून त्या पेट्या गावांतल्या मुलांना फ़कट वाटण्यात याव्यांत, म्हणजे इरोधी पक्षाला न भिणारी माझ्यासारखी ताठर मनोवृत्तीची पोरं, पंचवार्षिक योजनेत ठरल्याप्रमाणं तयार होतील आणि देशाच्या उपयोगी पडतील.

भारताला आज अनेक क्षेत्रांत प्रगति करावयाची आहे. त्यासाठीच आम्ही(?) पंचवर्षिय योजना काढल्या. त्यानुसार आपल्याला शास्त्राची सुद्धा प्रगति करावयाची आहे. पण या सगळ्याला कालावधी पाहिजे आहे; अभ्यासू-वृत्ति पाहिजे आहे. दरम्यानच्या कालांत आमच्या शास्त्रज्ञांनी जनावराच्या मुडद्याप्रमाणे माणसाच्या मुडद्यांत पेंढा भरून तो जतन करून ठेवण्याची युगत काढली असती तर मीं तेंच सुचवणार होतों की, माझं प्रेत माझ्या उभारल्या जाणाऱ्या स्मारकांत बसलेल्या पोझमधे ठेवून देण्यांत यावं. बसलेल्या पोझमधे असं लिहिण्याचं कारण म्हणजे अलिकडं उभं राहून राहून पायाला सूज येण्याची शिकायत मागं लागली आहे. 'तर

सांगन्याचं कारन म्हंजी अश्या प्रकारची फ्याशिलिटी तूर्तास आपल्याकडं न्हाई. ती ज्या टायमाला निघंल त्या टायमाला आपली भारतमाता ॲटमबॉंब बी तयार करू शकेल असं म्या इस्वासपूर्वक जाहीर करतो!'

'तवां नाविलाज म्हनून माजं प्रेत जाळून टाकावं. चितंला बाभळीचीं खोडंच लावावींत, कारन चदनाच्या लाकडांत जाळला म्हणून मुडद्याचा वास काई लपत न्हाई' शास्त्राला म्हणून दोन चार खोडं टाकायला हरकत नाही. मागं उरणारी चितेची राख जास्त पडावी म्हणून दहा-वीस मण लाकडं घ्यावींत. ती राख म्हणजे ह्या भारत मातेपासून वेगळा करतां न येण्याजोगा, माझ्या पार्थिव देहाचा अंश आहे. तो पुन्हा तिच्याच कुशींत जावा अशी माझी इच्छा आहे. म्हणून उरलेल्या राखेचीं पोतीं भरभरून तीं खताच्या फ्यॅक्टरीत पाठवावींत. दर क्विंटलला एक किलो याप्रमाणं ती राख खतांत मिसळावी. म्हणजे कंपनीला पण फायदा आणि माझा तो अंश माझ्याच शेतकरी-बांधवांच्या हस्ते मातीला मिळेल!

ह्या भारतमातेंत जन्माला आलेला प्रत्येक पुरुष हा भारताचा सुपुत्रच होय! ह्यामुळंच सगळेजण एकमेकावर अपरंपार प्रेम करतात. 'माझ्यावर बी अनेक बाया-बाप्यांनीं आन् पोरा-टोरांनी पिरेम केलं. त्या पिरमाचं रीण फडाया मला छपन्न जल्म सुदिक पुरनार न्हाईत. मंग उग त्या भानगडोत पडाच कशाला, म्हनतु म्या! आन् समजा, म्या घेतलं छपन्न जल्म, आन्, त्याच टायमाला ज्यांनी माज्यावर पिरेम केलं ती मानसं गाढवा-डुकराच्या जल्माला गेलीं असलीं म्हंजी आली का पंचाईत? त्ये ह्यटाक नगंच! त्यापरीस त्या समद्यांचं मी आत्ताच आभार मानतो!'

ह्या उप्पर काय लिहाव! मी माझ्या इस्टेटीची वाट लावली; 'माजा म्हनून जो काई एक इचार होतो तो लिवला. आन् आखरीला माझ्यावर पिरेम केलेल्या मानसांचे आभार मानले! तवां

इकतं सांगून आन् म्या लिवलेलं चार सबुद् ग्वाड माणून घ्या अशी इनंती करून म्या आपली रजा घेतों!'

|| जयहिंद, जय महाराष्ट्र ||

|| जय कोरेगाव, जय ऐतवडे खुर्द ||

# शेजाऱ्याच्या अंगणातून

खरंतर सोमलवार पती-पत्नीच्या भांडणात लक्ष घालण्याचं मला काही कारण नव्हतं. पण विदर्भातल्या नागपूर शहरात तीन-चार वर्ष राहिल्यानंतर, पुण्या-मुंबईच्या पाण्यावर पोसलेला माझा अलिप्त आणि तुसडा पिंड बराच लिबलिबीत झाला होता आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या 'खासगी' गोष्टीत लक्ष घालण्याचा हक्क मला प्राप्त झाला होता. शिवाय नवरा बायकोची भांडणं सोडविण्याचा गुण-कला म्हणा हवी तर-मला माझ्या आईवडिलांकडून मिळाला होता. मनसोक्त भांडणारे माझे आई-वडील शेजारपाजारच्या नवरा-बायकोची भांडणं सोडविण्याच्या वेळी मात्र उत्साहानं एकत्र येत आणि आदर्श पती-पत्नी असल्याचं चित्र उभं करीत.

चारू कन्नमवार दीड वर्षापूर्वी चारू सोमलवार झाली. विजय सोमलवारनं चारूसारख्या मुलीशी लग्न कसं केलं, हा बायकांचा दुपारच्या गप्पातला विषय असायचा; पण मला तिच्यात काही उणेपणा किंवा व्यंग जाणवलं नव्हतं. मॅट्रिक झालेली होती, श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी होती. थोडीफार चित्रकला अवगत होती, उंच-सुडौल बांध्याची होती आणि सर्वात मोठा गुण म्हणजे गुडघ्याच्या खालपर्यंत पोहोचणारे काळेभोर दाट केस! नावं ठेवण्यासाठी कारणंच शोधायची म्हटली, तर विजयपेक्षा चारू कमी शिकलेली, रंगानं जराशी काळी आणि मालगुजार बापाची एकुलती एक मुलगी असल्यानं बोलण्याचालण्यात चटपटीतपणाचा अभाव होता एवढंच! तिच्या नवऱ्याच्या तुलनेत हे सगळे अवगुणच भासत असत. विजय सोमलवार एम्.ए.

(अर्थशास्त्र) होता, रंगानं चारूपेक्षा थोडा उजळ होता, मध्यम स्थितीतनं कष्टानं वर आला होता, आणि आज बँकेत अधिकाऱ्याच्या जागेवर काम करत होता. त्यामुळं सासऱ्याच्या श्रीमंतीचं त्याला फार कौतुक नव्हतं. त्याचं बोलणंही जेवढ्यास तेवढं आणि नम्रतेचं होतं.

नव्याची नवलाई वर्ष दीड वर्षातच संपली आणि चारू व विजयमधल्या कुरबुरी बाहेर ऐकू येऊ लागल्या. मी गुंजारव अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावर पत्नीसह राहत होतो. चारूच्या आणि आमच्या घरामध्ये फक्त कंपाऊंड वॉल होती. त्या भिंती-पलीकडच्या मोठ्या प्लॉटवर बाबाजींनी (म्हणजे चारूच्या वडिलांनी) वर-खाली मिळून पाच सहा खोल्यांचा दुमजली टुमदार बंगला बांधून ठेवला होता, केवळ चारू आणि तिच्या नवऱ्यासाठी आणि नंतर येणाऱ्या संभाव्य परिवारासाठी! टुमदार बंगल्याच्या सहापदरी एकांतात राहणाऱ्या तरूण जोडप्यात एका वर्षाच्या आत कुरबुरी सुरु झाल्या, ही बाब मला वारंवार खटकत होती.

दोन-चार दिवसानंतर रात्री आवराआवर करून सुनंदा माझ्या शेजारी आडवी झाली आणि मी चारू-विजयचा विषय काढला.

'अलीकडं त्या दोघात बऱ्याच कुरबुरी व्हायला लागल्यात'-मी!

'आपल्याला काय करायचंय त्यात लक्ष घालून?'

सुनंदानं पहिल्याच घावात त्या दोघांबद्दल वाटणाऱ्या माझ्या आपुलकीची आणि त्यामागच्या सद्हेतूची खांडोळी उडवली! मी नोकरीतून निवृत्त झालो होतो. तरी माझ्या तलवारीची धार बोथट झाली नव्हती; पण विचार केला, 'हिला काही गोष्टीतलं मर्म चटकन् लक्षात येत नाही.' म्हणून मी आणखी एक प्रयत्न करायचं ठरवलं.

'आपण आता विदर्भात आलो आहोत. तुझ्या भावाच्या गावी! पुण्या-मुंबईकडला तुसडेपणा आता आपल्याला सोडला पाहिजे'- मी पोक्त सल्ला दिला.

सुनंदा माझ्याकडं क्षणभर बघत राहिली. 'तुझ्या भावाच्या गावी' हे शब्द तिला झोंबले असावेत. तिनं आणखी एक वार केला.

'रिटायर्ड झालात म्हणून दुसऱ्यांच्या गोष्टीत नाक खुपसण्याचा धंदा सुरू करण्याची काही गरज नाही. आपली अजून खूप कामं व्हायचीयेत्. टेलिफोन आला नाहीय्ये.... पेन्शन वेळेवर मिळत नाहीये, घराचा रंग काढायचाय्, बेसीनचा नळ गळतोय... त्याचा विचार करा जरा.'

'पुरेऽ! झोप आता!' सामाजिक प्रश्नावरून कौटुंबिक-व्यक्तिगत प्रश्नावर माझं लक्ष केंद्रित करण्याचा तिचा प्रयत्न यशस्वी झाला. तिनं हसून माझ्याकडं एक कटाक्ष टाकला, आणि क्षणभरानं माझ्याकडं पाठ फिरवून तिनं डोळे मिटून घेतले. मीही माझी नाराजी प्रकट करण्यासाठी तिच्या पाठीकडे पाठ फिरवून पडून राहिलो.

पण चारू आणि विजयचा विचार माझ्या डोक्यातून जाईना. कशावरून बिनसलं असावं दोघांचं? ... बाबाजींना बोलावून घ्यावं कां?...... का आपणच पुढाकार घेऊन त्यांचं भांडण मिटविण्याचा प्रयत्न करावा? .... आधी कुणाशी बोलावं? चारूशी की विजयशी?... आपण त्यांच्याकडं जावं, का त्यांनाच आपल्याकडं बोलावून घ्यावं?.... म्हातारा उगीच कशाला मध्ये पडतोय, असं तर विजयला वाटणार नाही ना? अनेक शंका-कुशंकांनी माझं मन भिरभिरू लागलं. त्या भरकटलेल्या अवस्थेत माझा डोळा केव्हा लागला ते माझं मलाच कळल नाही.

पुढचे चार-आठ दिवस शांततेत गेले. चारूचा किंवा विजयचा आवाज आला नाही, पण जाता येता दिसायचे. दोघात दिलजमाई झाली असावी, असा समज करून घेऊन मी पण त्यांच्या भांडणाचा विषय डोक्यातून काढून टाकला आणि गळणाऱ्या बेसीनच्या नळावर लक्ष केंद्रित केलं.

शनिवारचा दिवस होता. संध्याकाळी चार वाजता चहा घेऊन मी नळकऱ्याच्या शोधात बाहेर पडलो. न कर्त्याचा वार शनिवार! निवृत्त झाल्यापासून मी प्रत्येक वार शनिवार आहे असं समजून कामं टाळतो, अशी सुनंदाची पक्की समजूत झाली होती. त्यामुळं मी शनिवारी नळकऱ्याच्या शोधात बाहेर पडतोय हे पाहून तिच्या चेहऱ्यावर झळकलेलं आश्चर्य आणि टिंगलखोर हसू मला स्पष्ट दिसलं होतं.

एखादं काम व्हायचं असलं की, पटकन होऊन जातं या व्यावहारिक नियतीचा अनुभव मला त्या शनिवारी पुन्हा एकदा आला. आपल्याच पकडीनं, आपल्याच हातापायांच्या बोटांचे पेच 'टाइट' करत बसलेला कामसू नळकरी अर्ध्या-पाऊण तासाच्या शोधानंतर माझ्या नजरेस पडला.

अर्धा तास खटपट करून आणि अर्धा फ्लॅट ओला करून नळकऱ्यानं बेसीनच्या नळाचं गळणं बंद केलं. मी त्याच्या हातावर ठरलेले दहा रूपये टिकवले आणि त्याला पोहोचवायला दारापर्यंत आलो. त्याचवेळी चारूचा 'मेले, मेले,धावा धावा' असं किंचाळण्याचा आवाज आला.

सुनंदा गॅलरीकडे धावली. मी स्लीपर्स पायात सरकवून घराबाहेर पडणार तेवढ्यात चारू घरात शिरली आणि थेट बेडरूममध्ये जाऊन, सुनंदाच्या खांद्यावर डोकं टेकून ढसढसा रडू

लागली. सुनंदानं तिला समजावण्याचा प्रयत्न केला. काय झालं ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. चारू फक्त रडत होती.

'अहो, तुम्ही खाली जाऊन विजयला सांभाळा. म्हणावं अशी मारामारी करून प्रश्न सुटत नाहीत! तो तरी काय झालं ते सांगतोय का बघा'-सुनंदा.

चारच दिवसांपूर्वी 'आपण कशाला पडायचं त्यांच्या भांडणात' असं फटकारणारी सुनंदा आज मलाच सूचना देत होती. ते बघून मी गोंधळूनच गेलो; पण त्या क्षणी तिच्या सूचना योग्य होत्या. मी पुन्हा दाराकडे धाव घेतली.

माझी आणि विजयची दारापाशी टक्कर होता होता वाचली. त्याच्या डोळ्यातून राग ओसंडत होता. हातात हातभार लांब काडी होती. (नागपूरकर लाठ्या-काठ्यांना काड्या म्हणतात. धुणं वाळत घालायची काडी आणि मारामारी करायची पण काडीच!) मला बघताच त्यानं मलापण दम भरला.

'आबाजी, तुम्ही मध्ये पडू नका. आज तिला चांगली बदडून काढतो आणि बाबाजींच्याकडं कायमची रवाना करतो.'

'विजयराव, बायको तुमची आहे. तिचं काहीही करायला तुम्ही स्वतंत्र आहात; पण जे काय करायचं ठरवलय् त्याचे परिणाम कुणाला कसे, भोगावे लागतील त्याचाही विचार करा जरा!' अहो, मारामारीने प्रश्न सुटतात का कधी. शिवाय आपण शिकलीसवरलेली माणसं!... ती काठी आधी खाली टाका बघू!'

विजयनं काठी खाली टाकली. मी काठीचा ताबा घेत म्हटलं -

‘अहो शहाण्याला शब्दाचा मार पुरतो, त्या ऐवजी काठी?’

मी काठी पटकन दूर सरकवली, पण ‘शहाणा’ हा शब्द पकडून विजय पुन्हा भडकला.

‘चारू...? शहाणी...? मुलखाची बावळट, गबाळी आणि मूर्ख पोरगी आहे!’

‘तरी लग्न केलंत ना तिच्याशी?’

‘आबाजी, पहिल्यांदा बघितली त्या दिवशी चांगली वाटली; पण लग्नानंतर एक एक गोष्टी कळायला लागल्या. काय काय आणि किती सांगू तुम्हाला?’

‘सोफ्यावर शांतपणे बसा आणि सांगावसं वाटेल ते सगळं सांगा?’

‘आजचीच गोष्ट घ्या...’ सोफ्यावर बसून विजयनं सांगायला सुरुवात केली.

तो बराच वेळ बोलत होता. मी शांतपणे ऐकत होतो. त्यानं सांगितलेल्या गोष्टींचा सारांश असा की, विजयनं शनिवार-रविवारचा छानपैकी कार्यक्रम आखला होता. शनिवारी दुपारी वडाभाताचं छानपैकी जेवण, नंतर थोडी झोप. संध्याकाळी हिंदी चित्रपट बघायचा. नंतर भूक असेल त्याप्रमाणे ‘अशोका’मधे खाणं किंवा जेवण. रविवारी सकाळी मित्राच्या कारमधनं अमरावतीला बाजाजींना भेटायला जायचं रात्री त्याच कारनं परत!

‘अहो, माझ्या वाट्याला काय आलं? वाडग्यातल्या तेलात तरंगणारे चार कच्चे वडे! .. तेलानं तसाच थबथबलेला चारूचा थोबडा! आबाजी मला सांगा, संध्याकाळी सिनेमाला जायचं होतं, तर मग दुपारी तेल माखून न्हायची काय गरज होती?’

विजयचा प्रश्न बिनतोड होता. मी गप्प झालो. तिकडं बेडरूममध्येही शांतता पसरली होती. क्षणभरानं सुनंदा बाहेर आली. मला खूण करून तिनं स्वयंपाकघरात बोलावलं. आम्ही दोघांनी खलबत केलं. मी तिला म्हटलं,

‘आपल्या लग्नानंतर तुझ्या माझ्यात जो प्रश्न निर्माण झाला होता,तोच प्रश्न इथंही निर्माण झालाय. गबाळेपणाचा!’

‘मी इतकी गबाळी नव्हते हं!’

‘म्हणजे थोडी होतीस!’

‘तुमच्या आईनं शिक्का मारून मला गबाळी ठरवली होती.’

‘ते जाऊ दे! मी सांगतो तसं कर... चारूला सांग.. उद्या शांपूनं पुन्हा न्हाऊन बरोबर साडेनऊ वाजता अंगणात खुर्ची टाकून केस वाळवत बस... मी विजयला, नऊ वाजता काहीतरी निमित्त काढून वर बोलावून घेईन आणि गॅलरीत नेईन.’

‘कशासाठी हे सगळं?’

‘तुला नाही कळायचं. ते मानसोपचाराचं तंत्र आहे.... आज त्यांची वडा-भाताची इच्छा मात्र अपुरी राहणार.’ मी हळहळ व्यक्त केली.

‘वडा-भात करायला कितीसा वेळ लागणार आहे. घरात ‘वडा रेडी मिक्सची’ दोन पाकिटंपण आहेत. दोघांना जेवायला थांबवून घेऊ या.’

मी बाहेर आलो, विजयजवळ बसलो. त्याच्या मांडीवर थाप मारली आणि तिसऱ्याच विषयावर बोलणं सुरू केलं.

'विजयराव, बिअर पिणार कां?'

'आज?.... कशासाठी पण? - त्यानं गोंधळून विचारलं.'

'अहो आज आमच्या बेसीनचा नळ दुरुस्त झाला, सेलेब्रेट नको करायला.'

माझ्या अनपेक्षित उत्तरानं विजयला एकदम हसू आलं. तिकडून बेडरूममधूनही दोघींचा दबलेला हसण्याचा आवाज आला आणि पाठोपाठ दोघी स्वयंपाकघरात गेलेल्या आम्ही बघितल्या.

'चारू... स्वयंपाक घरात?'

'हो! सुनंदा तिला वडे कसे करायचे ते शिकवणार आहे. अहो, चारूची आई लहानपणीच वारली.... कोण होतं तिला शिकवायला? जमेल तसं करते बिचारी! पण आता काळजी करू नका. सुनंदा तिला चार महिन्यात कशी तयार करते बघा.... आणि हो. आज वडाभात खाऊन जायचं! आणि उद्या सकाळचा नाश्तापण आमच्याकडे, बरोबर नऊ वाजता!

आम्ही बोलत होतो...ट्रेमधे बिअरची बाटली, दोन ग्लासेस, खाऱ्या दाण्याची बशी घेऊन चारू आमच्याजवळ आली. टीपॉयवर ट्रे ठेवता ठेवता तिनं विजयकडं बघितलं, किंचित हसली आणि पटकन निघून गेली. मी पुन्हा विजयच्या मांडीवर थाप मारन म्हटलं, 'विजयराव, अशी बायको नशिबानं मिळते. अर्ध्या तासापूर्वी काय घडलं ते विसरून नवऱ्याकडं बघून खुद्‌कन हसणं सोपं नाही महाराजा!

विजयला ते पटलं असावं. तोही थोडासा हसला. भरलेला एक ग्लास माझ्या हातात देत म्हणाला -

‘चिअर्स’!

त्यानंतरचा रात्री अकरा वाजेपर्यंतचा वेळ कसा गेला ते आम्हाला कळलंय नाही. दोघांना निरोप देताना उद्याच्या रविवारच्या कार्यक्रमाची आठवण द्यायला आम्ही विसरलो नाही.

रविवारी सकाळी बरोबर नऊ वाजता विजय हजर झाला. कांदे-पोहे आणि चहा असा नाश्ता उरकून सिगरेट पिण्याच्या निमित्तानं मी विजयला बेडरूमलगतच्या गॅलरीत नेलं. आम्हाला दोघांना आश्चर्याचा धक्काच बसला.

जुनंच पण पांढरं शुभ्र पातळ नेसून, चारू न्हायलेले केस वाळवत उन्हात उभी होती. मोठी लाल भडक टिकली लावली होती. चेहऱ्यावर तेलकटपणाचा मागमूस नव्हता. मधूनच केसाच्या टोकाचं पाणी झटकत होती, तर कधी अर्धे केस पुढं घेऊन त्यातून हळुवारपणे बोटं फिरवत होती.

‘आबाजीऽ ही .... आमच्या अंगणात...?’

‘तुमचीच चारू आहे. बघा बघा! डोळे भरून बघा त्या ताज्या फ्लाकडं. मी ॲश ट्रे घेऊन येतो.’ मी पळ काढला.

नंतरचे चार महिने दर रविवारचा आमचा हा कार्यक्रम ठरूनच गेला. त्या चार महिन्यात खूप बदल घडून आले. सुनंदा आणि चारूमध्ये आई-मुलीचं नातं जुळलं, पक्कं झालं. चारू चांगला स्वयंपाक करू लागली. तिचं वागणं, बोलणंही चटपटीत झालं. पुढं पुढं चारू रोज एखादी चक्कर मारायची; पण विजयचं येणं-जाणं एकदम कमी झालं.

सहा महिन्यानंतर एका रविवारी संध्याकाळी अचानक दोघं उगवले. चारूच्या हातात फ़ुलांचा गुच्छ होता. दुसऱ्या हातात भाजीची पिशवी होती. त्यातून माझ्या आवडीची, तांबड्या माठाची भाजी डोकावत होती. विजयच्या हातात पण पिशवी होती. ती सोफ्यावर ठेवता ठेवता बिअरच्या बाटल्यांचा आवाज आला. तो माझ्या कानांनी बरोबर पकडला. दोघं आत आली. चारूनं हाताला धरून आम्हा दोघांना जवळजवळ उभं केलं. फ़ुलांचा गुच्छ आमच्या हातात ठेवला आणि दोघं पाया पडले.

'अरे, पोरांनो काय करता हे. आज आमच्या लग्नाचा वाढदिवस किंवा जन्मतारखेप्रमाणं पण वाढदिवस नाही. मग कशाला हे सगळं?'

'आज आमच्या संसाराचा वाढदिवस आहे. तुमच्यामुळं आमचा संसार सावरला, वाढला'- बोलता बोलता विजयचे डोळे हसले, पाणावलेसुद्धा.

'म्हणजे काय?' मी विचारलं.

'बावळटच आहात.' सुनंदानं ठेवणीतला वार केला. नंतर चारूकडं बघून म्हणाली 'यांना सगळं उलगडून सांगावं लागतं. सांगून टाक बाई!'

काही सांगण्याऐवजी चारू लाजून सुनंदाच्या मागं लपली आणि विजयला खाणाखुणा करू लागली. विजय म्हणाला,

'आबाजी, आम्ही आज डॉक्टरकडं जाऊन आलो. तुम्ही दोघं लवकरच आजोबा-आजी होणार आहात!'

‘आमचा संसार वाढला’ या शब्दांचा प्रकाश त्यावेळी माझ्या डोक्यात पडला. मी दोघांचं अभिनंदन केलं, कौतुक केलं. नंतर सेलेब्रेशन सुरू झालं. सुनंदा आणि चारू समोर येऊन बसल्या. बिअरचे घोट घेता घेता विजय म्हणाला, ‘आबाजी एक प्रश्न विचारणार आहे, खरंखरं उत्तर द्या. तुम्ही मला रविवारी नाश्त्याला बोलवून गॅलरीत का नेत होता?’

‘उत्तर सोपं आहे. तुला ती इंग्रजीतली म्हण माहित असेलच. अेव्हरीबडी लाइक्स हिज नेबर्स वाइफ! प्रत्येकाला शेजाऱ्याची बायको आवडते. मी त्याला फक्त पुस्ती जोडली.’

‘तसं असेल, तर शेजाऱ्याच्या अंगणातून तुम्ही स्वतःच्या बायकोकडं बघा. ती तुम्हाला आवडू लागेल!’

हास्याचा मोठा स्फोट झाला. हसू विरल्यानंतर विजयनं आणखी एक प्रश्न विचारला.

‘पण त्याचा प्रयोग आमच्यावर करून बघावा असं तुम्हाला कां वाटलं?’

‘स्वतःच्या अनुभवावरून!’ चारू पहिल्यांदाच इतक्या मिश्किलपणे आणि मोकळेपणानं बोलत होती.

‘हो, मला चांगलं आठवतंय्. लग्नानंतर आपण इथं राहायला आल्यावर बाबाजींनी रविवारी आबांना चहाला बोलावलं होतं. दोघं अंगणात ऊन खात बसले होते. मी चहाचे कप घेऊन बाहेर आले, तर आबा त्यांच्या गॅलरीकडं टक लावून बघत होते. म्हणून मी वर बघितलं, तेव्हा आई गॅलरीत उभ्या राहून केस वाळवत होत्या.’

पुन्हा हास्याचा स्फोट झाला. 'कार्टेऽऽऽ आमच्या फिरक्या....' असं म्हणून मी लटक्या रागानं चारूवर हात उगारला. 'चिअर्स' असं ओरडून ग्लास वर करण्याच्या निमित्तानं विजयनं माझा हात अडवला.  लाजण्याची पाळी सुनंदाची होती. चारूच्या खांद्याचा आधार घेऊन तो अभिनय तिनं छान वठवला. आईच्या गळ्यात हात घालून चारू कौतुकानं सुनंदाकडं बघत राहिली.

* * *

## छोट्या गोष्टी

**गोष्ट १ -**

एका गावांत एक सुशिक्षित कुंभार रहात होता. मडकी तयार करण्याच्या पारंपारिक धंद्याबरोबर तो कुंभार कविता पण करायचा. लोकांना आश्चर्य वाटायचं. याला दोन्ही गोष्टी कशा जमतात. खूप आग्रह करून सुद्धा आपल्या यशाचं रहस्य त्यानं बरेच दिवस कुणाला सांगितलं नाही. पण एक दिवस तो मडकी करण्यात गुंतला असतांना तो बोलून गेला- 'कबिराचे दोहे राम विणत असे. माझ्या कविता शेली विणतो.'

त्या दिवसापासून कुंभाराच्या कविता सोडाच पण मडकीही खपेनाशी झाली.

**गोष्ट २ -**

एका गावांत एका दैनिकाचा संपादक रहात होता. कुत्रा माणसाला चावला तर ती बातमी तो छापत नसे. पण माणूस कुत्र्याला चावला तर मात्र ती बातमी तिसऱ्या पानावर अग्रलेखाच्या खाली चौकटीत छापली जायची.

एक दिवस एक कुत्रा आणि एक माणूस एकमेकाला एकाच वेळी चावले.

त्या दिवशी संपादकानं राजीनामा देऊन दैनिक बंद करण्याचा सल्ला मालकाला दिला.

**गोष्ट ३ -**

एका गावात एक कामगार रहात होता. दिवसभर ‘हातमाग सहकारी सोसायटीत’ हात आणि मान मोडून काम करून थकून जायचा बिचारा. थकवा घालवण्यासाठी मग घरी परत जाताना, परवडेल अशी दारू पिऊन घरी जाऊन निपचित पडायचा. चार पाच वर्षं त्यानं अव्याहत हा कार्यक्रम राबवला.

एक दिवस सरकारी परवाना असलेल्या दुकानातली दारू पिऊन तो घरी गेला आणि निश्चिंतपणे झोपला.

त्यानंतर तो उठलाच नाही. मरावे परि सरकारमान्य दारू पिऊन मरावे, आणि गोष्ट रूपी उरावे.

**गोष्ट ४ थी –**

एका गावात भली मोठी औद्योगिक वसाहत होती. त्या वसाहतीत एका वेश्येचं घर होतं. घराच्या मालकिणीनं घरावर राजरोस पाटी लावली होती-‘चंपा आणि चंद्रा गमन निगम-एक सार्वजनिक उद्योग.’

पोलिसांनी तिला आणि तिच्या जुळ्या बहिणीला अनेक वेळा पकडली; (अर्थात तितक्याच वेळा सोडून पण दिली!) दंड केला, शिक्षा ठोठावली, पण तिचा धंदा बंद पडेना. शेवटी सरकारनं सर्व विषयांत तज्ञ असलेली ‘एक सदस्य समिती’ नेमली आणि ‘चंपा आणि चद्रा

गमन निगमच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करून त्याच्या (निगमच्या) कार्याला आवर घालण्याचे उपाय सुचवण्याची जबाबदारी त्या समितीवर सोपवली.'

एक सदस्य समितीच्या बैठका 'चंपा आणि चंद्रागमन निगमच्या कार्यालयातच सरकारी खर्चानं होऊ लागल्या.' समिती थकली तरी तिची मुदत दोन वेळा वाढवण्यात आली. (खास लोकांच्या खास शिफारशीवरून!) समितीनं आपला अहवाल सादर केलाच नाही. कारण समिती अजून कार्यरत आहे.

तात्पर्य - कुठलाही प्रश्न निकालात काढायचा नसेल तर एक सदस्य समिती नेमून सरकारनं स्वस्थ बसावं!!

## सुफीसंतांच्या कथा

### गोष्ट ५ -

सुफी शिक्षक लिबनानी याच्याकडं एक माणूस आला. त्या दोघांमधे खालीलप्रमाणे संवाद झाला -

माणूस - मी शिकू इच्छितो. आपण मला शिकवाल कां?

लिबनानी - कसं शिकावं याचं ज्ञान तुला आहे असं मला वाटत नाही.

माणूस - मग कसं शिकावं ते तरी तुम्ही मला शिकवा!

लिबनानी - मी तुला कसं शिकवावं हे, तू मला शिकवूं शकशील कां? तो माणूस निरुत्तर होऊन घरी गेला.

### गोष्ट ६ -

बहाउद्दीन-अल्-शाह आपल्या शिष्यांना घेऊन बसला होता. त्याचवेळी त्यांचे अनेक भक्त-गण एकदम सभागृहात घुसले. अल्-शहानी एक-एक करून प्रत्येकाला प्रश्न केला - 'आपण येथे कां आहात?'

पहिला - आपण पृथ्वीवरील सर्वांत श्रेष्ठ व्यक्ती आहात.

अल्‌शाह - हा गृहस्थ आजारी असतांना मी त्याला औषधाचा एक डोस दिला. म्हणून तो मला पृथ्वीवरील सर्व श्रेष्ठ व्यक्ती समजत आहे..... आपण?

दुसरा भक्त - आपल्याला भेटण्याची आपण परवानगी दिलीत तेंव्हा पासून माझं अध्यात्मिक जीवन खुलू लागलं!

अल्‌शाह - याचं मन अस्थिर आणि आजारी होतं. मी त्याच्या जवळ बसलो, त्याचं बोलणं ऐकलं. त्यानंतर त्याला जी शांतता लाभली त्यालाच तो अध्यात्मिक जीवन असं म्हणत आहे. .. आपण?

तिसरा भक्त - आपण मला समजून घेतलंत. आता माझी एकच विनंती आहे. आपली प्रवचनं ऐकण्याची परवानगी देऊन माझ्या आत्म्याचा उद्धार करावा!

अल्‌शाह - त्याच्याकडं कुणीतरी लक्ष द्यावं अशी त्याची इच्छा होती. त्याच्यावर टीका करण्यासाठी लक्ष दिलं तरी त्याची हरकत नव्हती. असं लक्ष्य देण्यालाच तो आत्म्याचा उद्धार समजतोय्! ....(चौथ्याला) आपण?

चौथा भक्त - मी एका गुरूकडून दुसऱ्याकडं जात राहिलो. ते शिकवतील त्याचा अभ्यास करत राहिलो. पण तुम्ही मला जे कोडं घातलंत त्यानंतरच मला खऱ्या प्रकाशाचा स्पर्श झाल्यासारखं वाटलं!

अल्शाह - मी त्याला घातलेलं कोडं (किंवा सांगितलेला अभ्यास) रचून सांगितलं होत. (काल्पनिक होतं.) आणि त्याचा, त्याच्या आध्यात्मिक जीवनाशी काही संबंध नव्हता. त्याच्या मनात अध्यात्माबद्दल असलेल्या भ्रमाचा निचरा करणं हा मुख्य हेतू होता. तसं झालं असतं तरंच मी त्याच्या मूळ वृत्तीपर्यंत पोहचू शकलो असतो, जी खरी अध्यात्मवादी आहे!

**गोष्ट ७ -**

सलिब क्कॉझविननं आपल्या शिष्यांना शिकवलं होतं की, जो कोणी माझ्या दारावर सारखी टक्टक् करील त्यालाच दार उघडलं जाईल.

राबियानं एक दिवस क्कॉझविन साहेबांना नम्रपणे विचारलं 'आपण म्हणतां ते खरं असेल. पण दार किती काळ उघडं राहील? कारण दार कधीच बंद नसतं!!'

**गोष्ट ८ -**

एक माणूस, जो मेला आहे असं समजलं जात होतं आणि ज्याच्या अंतयात्रेची तयारी चालू होती, एका एकी उठून बसला. त्याच्या भोवती चाललेल्या समारंभाचं दृश्य बघून त्याला धक्का बसला आणि तो बेशुद्ध झाला. लोकांनी त्याला तिरडीवर बांधला आणि अंत्ययात्रा

स्मशानाकडं निघाली. स्मशानात पेहोचल्यावर त्या माणसाला शुद्ध आली आणि तिरडीच्या दोऱ्या सोडण्यासाठी तो ओरडूं लागला.

शोकाकुल लोकांचं मत पडलं की तो जिवंत असणं शक्य नाही. कारण तज्ञ डॉक्टरांनी तो मेलाय असं सर्टीफिकीट दिलंय्! 'अहो, पण मी जिवंत आहे' ती व्यक्ती पुन्हा ओरडली.

भोवती जमलेल्या लोकात एक प्रतिष्ठित, तटस्थ आणि कायद्याचं ज्ञान असलेली व्यक्ती होती. मृत व्यक्तीनं त्याच्या पुढं आपलं गाऱ्हाणं मांडलं.

'एक मिनिट!' वकीलानं मृत व्यक्तीला थांबायला सांगितलं. नंतर तो तिथं जमलेल्या व्यक्तींकडे वळला, त्यांची संख्या मोजली आणि त्यांना उद्देशून म्हणाला-'ज्याला आपण मृत समजत होतो त्याचं म्हणणं आपण सर्वांनी ऐकलं. तुम्ही पन्नासजण साक्षीदार आहात. सत्य काय आहे त्याबद्दल तुमचं मत मला सांगा.'

'तो मेलेला आहे'- सर्वांनी एकमुखानं साक्ष दिली.

'आपण बहुसंख्येनं मत मांडलेलं आहे. तेव्हा तो मेलाय हे सिद्ध होतं. त्याला जाळून टाका'- वकीलानं अंतिम निर्णय दिला.

लोकांनी मोठ्या उत्साहानं त्या व्यक्तीचं अंत्यकर्म पार पाडलं.

सुफी संत सांगतात- 'माणसाचं अस्तित्व, ही समस्या आहे कां? उत्तरासाठी बहुसंख्य लोकांचं मत, डॉक्टर, वकील यांचा सल्ला घेउ नका! जीवनाकडंच जा. अस्तित्वाकडंच बघा!'

**गोष्ट९ -**

एका माणसाची कुऱ्हाड हरवली. शेजाऱ्याच्या मुलावर त्याचा संशय होता. त्या मुलावर त्यानं लक्ष ठेवलं. त्या मुलाच्या हालचालीवरून त्या माणसाची खात्री पटली की त्या मुलानंच कुऱ्हाड चोरली आहे.

मुलाच्या चेहऱ्यावरचे हाव-भाव, त्याचं बोलणं-चालणं-वागणं सगळं स्पष्ट करत होतं की कुऱ्हाड त्यानंच चोरली आहे.

पुढे काही दिवसांनी तो माणूस बागेत काम करत असतांना एका मातीच्या ढिगाऱ्याखाली त्याला त्याची कुऱ्हाड सापडली.

दुसरे दिवशी त्या माणसानं शेजाऱ्याच्या मुलाला दारावरून जातांना बघितलं. पण त्या मुलाच्या चालण्यावरून, हांवभावावरून स्पष्ट होत  नव्हतं की कुऱ्हाड त्यानंच चोरली होती.

होय-नाही, खरं-खोटं हे सगळे मनाचे खेळ असतात.

**गोष्ट १० -**

सादीनं आपल्या शिष्यांना एक कथा सांगितली.

एका माणसाची मुलगी अतिशय कुरूप होती. त्यानं तिचं लग्न एका आंधळ्या माणसाशी करून दिलं. कारण कोणत्याही डोळस माणसानं त्या मुलीशी लग्न केलं नसतं.

एका डॉक्टरनं त्या आंधळ्या माणसाला तपासलं आणि त्याची दृष्टी परत आणून देण्याची तयारी दाखवली. पण मुलीचा बाप त्या गोष्टीला तयार झाला नाही. कारण बापाला भिती वाटत होती की आंधळ्याला दृष्टी आल्यावर तो आपल्या मुलीला घटस्फोट देईल.

सादीनं निष्कर्ष काढला कुरूप स्त्रीचा नवरा आंधळा असलेलाच बरा!

**गोष्ट ११ -**

एक मुलगा समुद्र किनाऱ्याजवळ रहात होता. तो दररोज समुद्र किनाऱ्यावर फिरायला जात असे. सीगल पक्षांच्या सहवासात भटकंतो करायला त्याला खूप आवडत असे. शेकडो सीगल ही त्याच्या सहवासात फिरत असत.

एक दिवस मुलाचे वडील त्याला म्हणाले, ‘तुझ्याबरोबर अनेक सीगल पक्षी हिंडतात हे मी पाहिलं आहे, त्याचे आवाज ऐकले आहेत. आजारपणामुळं मी समुद्र किनाऱ्यावर हिंडू शकत नाही. तेव्हा माझ्या बरोबर खेळण्यासाठी तू काही सीगल पक्षी घेऊन ये.’

दुसरे दिवशी तो मुलगा जेव्हा समुद्र किनाऱ्यावर फिरायला गेला तेव्हा सीगल पक्षी त्याच्या डोक्यावर उडत राहिले पण एकही सीगल खाली आला नाही.

सादी म्हणाला - 'तुमच्या हृदयात उडणारे तरंग पक्षांना बरोबर कळतात, स्पंदनं समजू शकतात. म्हणूनच सीगल खाली आले नाहीत.'

**गोष्ट १२ -**

एक दिवस शिबली, जन्नाईड नावाच्या ज्येष्ठ संताला भेटायला गेला. शिबलीला पाहून जन्नाईडच्या पत्नीनं स्वतःला पडद्या आड लपवण्याचा प्रयत्न केला. जन्नाईडनं पत्नीला आज्ञा केली 'जिथं आहेस तिथंच उभी रहा. शिबली हजर नाहीये.'

त्याच क्षणी शिबलीनं रडायला सुरुवात केली. ते पाहून जन्नाईडनं पत्नीला पुन्हा ओरडून सांगितलं 'आता पडद्याआड गेलीस तरी चालेल, कारण शिबली परत आलाय्.'

**गोष्ट १३ -**

एका श्रीमंत माणसानं ओवायसी-अल्-कुरानीला थैलीभर नाणी देऊ केली. तेव्हा ओवायसी म्हणाला - 'मला त्याची गरज नाही. कारण माझ्याकडं आधीच एक नाणं आहे.'

श्रीमंत माणूस म्हणाला, 'चिल्लर नाणं तर आहे. तुला ते नाणं किती दिवस पुरणार आहे?'

ओवायसीनं उत्तर दिलं - 'तू मला खात्री दिलीस की तू देऊ केलेली नाण्याची थैली संपेपर्यंत मी जिवंत राहीन तरच मी तुझ्या थैलीचा स्वीकार करीन.'

* * *

'दैनिक मराठा'

सोमवार दि.१७ एप्रिल १९६७

पूर्वार्ध

## कुठें प्लेटो, कुठें ज्ञानदेव आणि कुठें सोनोपंत

**पाश्चात्य तत्त्वज्ञान श्रेष्ठ कीं भारतीय तत्त्वज्ञान श्रेष्ठ ? पाश्चात्य तत्त्वज्ञानांतील गणिती तर्कशुद्धतेच्या कसोटीला भारतीय तत्त्वज्ञानांतली साक्षात्काराची कल्पना उतरू शकते काय? मग साक्षात्कार कल्पनेचा उदो उदो भारतांत का माजला? कुणी माजवला? हे आणि असे कांही विलक्षण धक्के देणारे प्रश्न उपस्थित करणारा डॉ.ग.ना. लवंदे ह्यांचा एक मर्माघाती आणि तीव्र उपहासाने धगधगणारा बोचक लेख -**

प्रा. शंकर वामन उर्फ सोनोपंत दांडेकर हे उभ्या महाराष्ट्राला परिचयाचे आहेत. संत वाङमयाचे व त्यातल्या त्यात ज्ञानेश्वरांचे एक निष्ठावान अभ्यासक असा त्यांचा लौकीक आहे. शिवाय ते वारकरी सांप्रदायाचे एक प्रमुख महंत असल्याने पंढरपूर, आळंदी, देहू इत्यादी ठिकाणी त्यांचा भक्तगण विखुरलेला आहे. सोनोपंतांचे वैशिष्ट्य असे की, ते केवळ महंतच आहेत असे नव्हे तर त्यांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे ते पंतही आहेत. कितीतरी वर्षे त्यांनी तत्त्वज्ञानाचे अध्यापन केले असून महाराष्ट्रातले जे जुने व जाणिते असे समजले जाणारे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आहेत. त्यामध्ये त्यांनी अग्रपूजेचा मान मिळविला आहे. बरीच वर्षे ते पुण्याच्या सर परशुरामभाऊ व मुंबईच्या रूइया महाविद्यालयात तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख होते. तसेच कांही वर्षे त्यांनी परशुरामभाऊ कॉलेजचे प्राचार्यपदही विभूषित केले होते. एवंगुणविशिष्ट संत व महंत

असूनसुद्धा पंत असलेल्या सोनोपंतांनी ज्ञानदेव व प्लेटो यांचा तौलनिक अभ्यास करून ज्ञानदेव व प्लेटो हा ग्रंथ लिहिला आहे.

**✻ एक अकारण गैरसमज –**

हा ग्रंथ म्हणे प्रा.दांडेकरांनी कौशिक व्याख्यानमालेत दिलेल्या चार व्याख्यानांचा समावेश आहे. ही व्याख्यानमाला पुण्याच्या शिक्षण प्रसारक मंडळीच्या विद्यमाने प्रति वर्षी चालते व त्या व्याख्यानमालेचे संस्थापक बृहन्महाराष्ट्र साखर कारखान्याचे संस्थापक कै.चं.वि.आगाशे हे होत. या ग्रंथाला महामहोपाध्याय पद्मविभूषण दत्तोपंत पोतदार यांची प्रस्तावना असून या ग्रंथामुळे मराठी वाङमयात एक चांगलीच भर पडली आहे अशी त्यांनी ग्वाही दिली आहे. प्लेटो व ज्ञानदेव यांच्या सारख्यांच्या तत्त्वज्ञानाचा विषय, सोनोपंतासारखे लेखक व दत्तोपंतासारखे प्रस्तावनाकार या त्रिवेणीसंगमामुळे या ग्रंथाला एक आगळे महत्व आहे असे सर्वसामान्य वाचकास वाटण्याचा संभव आहे व तो समज सकृतदर्शनी खराही आहे. तेव्हा या ग्रंथाचे महत्त्व काय, या ग्रंथाने मराठी वाङमयात खरोखरीची महत्त्वाची भर पडली आहे काय, याचा उलगडा होणे आवश्यक आहे. तेव्हा या ग्रंथाचे सडेतोड परीक्षण करून या ग्रंथाची काय लायकी आहे ते पुराव्यानिशी सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

ज्ञानदेवाचे तत्त्वज्ञान हे प्लेटोच्या तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे. असे सिद्ध करण्याचा प्रा.दांडेकरांचा हा बालीश व हास्यास्पद असा प्रयत्न आहे. त्याच्याच अनुषंगाने भारतीय तत्त्वज्ञान हे पाश्चात्य तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे असे सोनोपंतांना सिद्ध करावयाचे आहे.

आपल्याकडे असा एक समज रूढ आहे की, भारतीय तत्त्वज्ञान ही तत्त्वज्ञानाची उच्चतम अशी अवस्था आहे व त्या मानाने पाश्चात्य तत्त्वज्ञान हे निकृष्ट आहे. राजकारणात व शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठेच्या स्थानी असलेल्या काही मूर्ख आणि कांही लुच्च्या इसमांनी हा खोटा समज प्रसृत केला आहे. खरे पाहिले असता भारतीय तत्त्वज्ञाना हे पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या पासंगालाही पुरणार नाही. उपनिषदे काय, गीता काय व इतर भारतीय दर्शने काय त्यात तत्त्वज्ञानापेक्षा बुवाबाजीच अधिक आहे. प्लेटो, ॲरिस्टोटल वगैरे पहिल्या श्रेणीच्या पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या मानाने आमचे शंकराचार्य व इतर आचार्य इतके बुटके वाटतात की, ते या पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या पायाशी सुद्धा बसण्याच्या लायकीचे वाटत नाहीत. मी हे केवळ भारतीय तत्त्वज्ञान्यांच्या पक्षपाती लोकांना खिजविण्याकरिता लिहीत नाही, तर पूर्ण जबाबदारीने मी हे मत मांडीत आहे. ज्यांना माझे हे मत अतिशयोक्तीचे वाटत असेल त्यांनी ते खोडून काढावे असे माझे त्यांना आव्हान आहे. खरी गोष्ट अशी आहे की, भारतीय तत्त्वज्ञानाचा उदोउदो करणाऱ्या सोनोपंतांसारख्या नालायक प्राध्यापकांनी पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यासच मुळी केलेला नाही हे मी पुढे सिद्ध करणारच आहे. परंतु ओघाला आले म्हणून सांगणे भाग आहे की, सोनोपंतांनी प्लेटोचा अभ्यास मुळीच केलेला नाही व इतर पाश्यात्य तत्त्वज्ञान्यांची त्यांना कितपत तोंडओळख आहे याविषयी मला जबरदस्त शंका आहे. सोनोपंतांचे कौतुक अशाकरिता करायचे की, प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा खोल अभ्यास न करता केवळ जुजबी परिचयाच्या आधारावर त्यांनी ज्ञानेश्वरांपेक्षा प्लेटोला कमी लेखण्याचा जो प्रयत्न केला आहे त्या धाडसाचे.

खरे पाहिले असता ज्ञानदेव व प्लेटो यांच्या तत्त्वज्ञानाची तुलनाच होऊ शकत नाही. याचे कारण असे की, ज्या अर्थाने प्लेटो हा तत्त्वज्ञानी आहे त्या अर्थाने ज्ञानदेव हा तत्त्वज्ञानी मुळींच नाही. प्लेटोचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान आहे. ज्ञानदेवाचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान मुळीच नाही. स्वतः ज्ञानदेवानीच आचार्यांची वाट पुसत चाललो अशी कबुली दिली आहे. ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान म्हणजे शंकराचार्यांचे अद्वैत तत्त्वज्ञान, तुलनाच करावयाची तर प्लेटो व शंकराचार्य यांची. या तुलनेत ज्ञानदेवांचे स्थान आहेच मुळी कुठे? ज्ञानेश्वरी हा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ आहे असे कुणी समजत नाही. ज्ञानेश्वरांत फक्त अद्वैत तत्त्वज्ञानाच्या अनुरोधाने गीतेचा अर्थ काव्यात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. असे असताना प्राध्यापकांनी तत्त्वज्ञान शोधून काढण्या प्रयत्न करावा हा शुद्ध पागलपणा आहे व इतके करूनच्या करून 'अगा जे झालेच नाही' या आधारावर प्लेटोपेक्षा श्रेष्ठ ठरविण्याचा प्रयत्न करणे याच्यासारखा बेवकूफपणा दुसरा नाही. आपली हयात तत्त्वज्ञान शिकविण्यात घालविली असे अभिमानाने सांगणाऱ्या सोनोपंतांना हे शोभत नाही. परंतु शोभत नाही हे तरी कसे म्हणावे? कांही झाले तरी सोनोपंत बुवा म्हणूनच अधिक लौकिकवान आहेत व एकदा बुवा म्हटल्यावर त्यांच्यावर सत्यासत्यतेची जबाबदारी तरी का म्हणून लावावी? बुवाच ते!

**सोनोपंतांची बौद्धिक दिवाळखोरी –**

तात्पर्य काय कीं ज्ञानदेवांचे स्वतंत्र असे तत्त्वज्ञान नसल्याने ज्ञानदेवाच्या तथाकथित तत्त्वज्ञानाची प्लेटोसारख्या तत्त्वज्ञाच्या तत्त्वज्ञानाशी तुलना करणे याला स्वतःच्या बौद्धिक दिवाळखोरीशिवाय सोनोपंतांकडे दुसरा पुरावा असणे संभवत नाही. परंतु हीहि दिवाळखोरी एखादे

वेळी क्षम्य ठरली असती.  परंतु मौज अशी की, सोनोपंतांनी प्लेटोच्या संवादांचे एकदा सुद्धा वाचन केलेले दिसत नाही. सोनोपंतांनी प्लेटोच्या सर्व संवादांचे पारायण करून त्यांच्यावर उपलब्ध असलेल्या टीका व इतर साहित्य याचा अभ्यास करून आपले मत बनवले असते तर सोनोपंतांच्या या उपक्रमाचे माझ्यासारख्या प्लेटोच्या तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्याने स्वागतच केले असते. परंतु तसा कांही प्रकार इथे दिसत नाही. सोनोपंतांचा एकमेव उद्देश म्हणजे कांहीहि व कसेहि करून ज्ञानदव हे प्लेटोपेक्षा श्रेष्ठ आहेत हे सिद्ध करणे हा होय.  ही शुद्ध बौद्धिक लफंगेगिरी आहे. काय गंमत आहे पहा. सोनोपंत हा इसम इतकी वर्षे तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक या नात्याने प्लेटो शिकवत होता. किती तरी विद्यापीठांतून या गृहस्थाने प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा परीक्षक म्हणून काम केले असावे. त्याचप्रमाणे कितीतरी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना त्यांनी प्लेटोच्या तत्त्वज्ञानाविषयी मार्गदर्शन केले असावे. अशा या इसमाने प्लेटोचे सर्व संवाद एकदाहि वाचलेले नसावे या प्रकाराला काय म्हणावे? विद्यार्थीवर्गावर काय हा अत्याचार? प्लेटोचे संवाद वाचले असते म्हणजे सोनापंतांना प्लेटोचे तत्त्वज्ञान कळले असते असे समजण्याचे बिलकुल कारण नाही. काय माय व्याली आहे सोनोपंतांना प्लेटोचे तत्त्वज्ञान कळण्याची. ज्याने आपली सर्व हयात 'ज्ञानदेव, तुकाराम, ज्ञानोबा तुकाराम' करीत घालवली, ज्याचा रोजचा उद्योग म्हणजे कुठल्या तरी गल्ली बोळांत प्रवचन किंवा कीर्तने करणे अशा या सोनोपंतांना प्लेटो कळणे म्हणजे कॉंग्रेसवाल्याकडून सत्य-अहिंसेची अपेक्षा करण्यासारखे आहे. सोनोपंतांना मी किती तरी वर्षे ओळखतो. तत्त्वज्ञानाच्या प्रांतांत त्यांची काय लायकी आहे व त्यांची बौद्धिक कुवत काय आहे. परंतु, प्लेटोच्या तत्त्वज्ञानावर हा मूर्ख इसम हात टाकील असे मात्र मला वाटलं नव्हतं.  मला आश्चर्य

वाटते ते डॉ.कावळे व डॉ. (कु.) लीला गोळे या परशुरामभाऊ कॉलेजमधल्या प्राध्यापकद्वयांचे! या प्राध्यापकद्वयांनी हे पुस्तक छापून 'बाहेर काढतांना आपल्याला मदत केली असे सोनोपंत आवर्जून लिहितात. त्यांनी तरी या सोनोपंतांना वेळीच आवरायला पाहिजे होते का या प्राध्यापकद्वयांनी सुद्धा प्लेटो वाचला नाही?' असे असेल तर पुणे विद्यापीठाने तत्त्वज्ञान हा विषय शिकविण्याचे बंद करावे म्हणजे विद्यार्थ्यांचे हाल वाचतील व तत्त्वज्ञान या विषयाची अप्रतिष्ठा थांबेल.

**ज्ञानदेवांची शपथ तुम्हाला -**

माझ्या विवेचनाचा रोख असा की, सोनोपंतांनी सबंध प्लेटो न वाचताच केवळ ज्ञानदेवांच्या खोट्या अभिनिवेषाने प्लेटोला कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. या माझ्या आरोपाचे समर्थन करण्याकरता मला आता पुरावा सादर करणे आवश्यक आहे व ते मी आता करणार आहे. आपल्या ग्रंथाच्या पान १८ वर सोनोपंत लिहितात, 'एक पार्मेनाइड्स नांवाचा संवाद सोडून दिला तर बाकीच्या सर्व संवादातून त्याचा गुरु सॉक्रेटिस हाच मुख्य वक्ता, तत्त्वज्ञानाची चर्चा करून मार्गदर्शन करणारा म्हणून दाखविला आहे'. हे वाक्य वाचल्यानंतर मला सोनोपंतांना अशी विनंती करावयाची आहे. 'सोनोपंत तुम्हाला विठोबा, ज्ञानदेव, तुकाराम व इतर संत यांची शपथ आहे तुम्ही खरोखर प्लेटोचे सर्व संवाद वाचले आहेत का? खरे सांगा, खोटे सांगू नका.' माझी खात्री आहे की, जर का सोनोपंत प्रामाणिक असतील तर ते आपण प्लेटोचे सर्व संवाद वाचले नाहीत असे कबूल करतील. याचे कारण असे की पार्मेनिडीसशिवाय असे इतर संवाद आहेत की, जिथे सॉक्रेटिसला दुय्यम स्थान आहे व आमचे सोनोपंत तर असे सांगतात की, केवळ पार्मेनिडीसमध्येच सॉक्रेटिसला दुय्यम स्थान आहे. मला सोनोपंतांना असे विचारावयाचे आहे की, काय सोनोपंत प्लेटोचा सोफिस्ट व टीमॅकस

हे संवाद आपण कधी वाचले आहेत का? या संवादांत सोक्रेटिसला काय स्थान आहे? पार्मेनिडीसमध्ये निदान सॉक्रेटिस व पार्मेनिडीस यांचा संवाद तरी चालला होता. परंतु सोफिस्ट व

टीमॅकस मध्ये सॉक्रेटिस हा केवळ श्रोत्याचीच भुमिका पत्करतो व जे विवेचन चाललेले असते त्यांत चुकून सुद्धा भाग घेत नाही. तीच गोष्ट स्टेटसमन  या संवादाची.  यांत सुद्धा सॉक्रेटिसला बोलण्याची संधीच मुळी दिली गेलेली नाही. याच्याहीपेक्षा प्लेटोचा जो शेवटचा समजला जाणारा संवाद ‘ लॉज’ त्यांत सॉक्रेटिसचे नांव सुद्धा नाही. हे सर्व संवाद प्लेटोचे नाहीत असे का सोनोपंतांना म्हणावयाचे आहे? अजूनर्यंत कोणीही हे सर्व संवाद प्लेटोचे नाहीत असा दावा केलेला नाही. तर मग सोनोपंतांनी आपले विधान कोणत्या आधारावर केले आहे? याला उत्तर एकच म्हणजे प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचे अज्ञान. सोनोपंतांनी सोफिस्ट  , टीमॅकस, स्टेटसमन, लॉज वगैरे प्लेटोचे संवाद वाचलेले नाहीत हा जो मी त्यांच्यावर आरोप करीत आहे याचे कारण असे की जर का सोनोपंतांनी हे संवाद वाचले असते तर पार्मेनिडीसशिवाय इतर संवादांत सॉक्रेटिसला मुख्य स्थान आहे असे विधान त्यांनी केले नसते. याचा अर्थ असा की, सोनोपंतांनी सबंध प्लेटो न वाचताच हा ग्रंथ लिहिण्याचा उपक्रम केला आहे व अत्यंत चीड आणणारी गोष्ट अशी की कांही कारण नसताना प्लेटोला ज्ञानदेवापेक्षा कमी दर्जाचा लेखण्याचा प्रयत्न केला आहे. बौद्धिक गुंडगिरीचे याच्याइतके किळसवाणे प्रदर्शन दुसरीकडे सापडणे शक्य आहे काय?

**सोनोपंतांचा अव्यापारेषु व्यापार -**

परंतु खरी गंमत पुढेच आहे. सोनोपंतांनी प्लेटोचे सर्व संवाद वाचले नाहीत याचा पुरावा मी वर सादर केला आहे. परंतु हे संवाद न वाचता आपण ते सर्व संवाद वाचले आहेत इतकेच नव्हे तर त्या संवादासंबंधी आपण जबरदस्त मनन केलेले आहे असे सोनोपंतांना आपल्या वाचकांना भासवायचे आहे. त्याकरीता त्यांनी पान ४६-४७ वर प्लेटोच्या संवादांचे तीन संच कल्पून कोणत्या संचात कोणते संवाद अंतर्भूत आहेत याचे कोष्टक दिले आहे. हा सर्व प्रकार पाहिल्यावर सोनोपंतांच्या अज्ञानाला हंसावे का रडावे हेच मुळी कळत नाही. ज्याला ग्रीक भाषा येत नाही त्याने प्लेटोच्या संवादांची कालानुक्रमणिका लावण्याचा मुळींच प्रयत्न करू नये. सोनोपंतांना ग्रीक भाषा येते की नाही हे मला माहीत नाही. कदाचित येत नसावी. असे असेल तर हा अव्यापारेषु व्यापार करण्याची सोनोपंतांना कांहींच जरूरी नव्हती. परंतु आपल्या नकली विद्वत्तेचे प्रदर्शन करण्याची संधि कां घालवा? तेव्हा आमच्या सोनोपंतांनी आपल्या अक्कलहुशारीने सुरुवातीचा, मधला व शेवटचा असे तीन संच कल्पून प्लेटोच्या संवादाची विभागणी केली व असे

करताना आपल्या बौद्धिक दिवाळखोरीचेहि प्रदर्शन केले. वास्तविक ज्या ज्या प्लेटोच्या अभ्यासकांनी प्लेटोच्या संवादांची कालानुक्रमणिका लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यात सर्वांची एकवाक्यता मुळींच झाली नाही व तसे होणे सर्वस्वी अशक्य होते. तरी पण या सर्व अभ्यासकांमध्ये कांही संवादांबद्दल एकवाक्यता आहे. उदाहरणार्थ रिपब्लीक.................. दूरचा का नंतरचा या संबंधी विद्वानांमध्ये मतभेद असू शकेल. परंतु झरीशपळवशी, ढहशरशींर्शीीी, डेहिळीीं वगैरे संवाद ठशर्शीलिश्रळल च्या नंतरचे आहेत. या गोष्टीबद्दल प्लेटोच्या अभ्यासकांत एकमत आहे. डीळ. थ.ऊ ठींी यांनी आपल्या 'झश्रररींी ढहशेीूष खवशरि' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथांत पान ४ वर अीाळप, डींीश्ररीङ्गळ, ठरशवशी, ठळींीशी, थळश्ररोुळीं या पांच सर्वश्रेष्ठ अशा प्लेटोच्या संवादांच्या अभ्यासकांची मते दिली आहेत, व या सर्वांनी वर उधृत केलेले संवाद ठशर्शीलिश्रळल च्या नंतरचे आहेत असेच आपले मत नमूद केले आहे. झरीशपळवशी हा संवाद ढहशरशींर्शीीी च्या अगोदरचा का नंतरचा याबद्दल मतभेद असू शकेल. परंतु झरीशपळवशी, ढहशरशींर्शीीी, डेहिळीीं ही संवादत्रयी ठशर्शीलिश्रळल च्या नंतरची आहे याबद्दल मात्र या विद्वानांचे एकमत आहे. ढरूश्री, ठींी, उीपषीव वगैरे अनेकांचे हेच मत आहे.

परंतु ज्या या विद्वानांनी आपले सबंध आयुष्य प्लेटोच्या तत्त्वज्ञानाच्या अध्ययनात घालवलं त्या या विद्वानांचे हे एकमत आमच्या सोनोपंतांना मात्र मंजूर नाही. याचा अर्थ असा नव्हे की, या विद्वानांप्रमाणे आपले भिन्न मत बनविण्यापूर्वी सोनोपंतांनी आपली सर्व हयात प्लेटोच्या अध्ययनांत घालवली आहे. तसला प्रकार सोनोपंतांच्या बाबतींत संभवणे शक्य नाही. सोनोपंतांचे वैशिष्ट्य हे की, प्लेटोच्या संवादाचा अभ्यास न करता इतकेच नव्हे तर प्लेटोच सर्वच्या सर्व संवाद न वाचता या आमच्या हरिभक्ताने आपले मौल्यवान असे मत बनवले आहे. याचा स्पष्ट अर्थ असा की, सोनोपंतांना प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा अर्थच मुळी कळलेला नाही. आणि कळणार तरी कसा? जिथे प्लेटोचे सर्व लिखाण ज्याने डोळ्याखालून सुद्धां घातलं नाही तिथे अर्थ समजण्याचा प्रश्न येतोच मुळीं कुठें? परंतु सोनोपंतांचा अहंकार एवढा दांडगा की,

त्यांना आपल्या मताचे प्रदर्शन केल्याशिवाय राहवेना. तेव्हा ......... ..............................

बाप हो Republic हा संवाद Parmenides, Theaetetus, Sophist या संवादत्रयीच्या नंतरचा बरं का? आत या कर्माला काय म्हणावं? याचा साध्यासुध्या भाषेंत अर्थ असा की, प्लेटोच्या तत्त्वज्ञानाच्या बाबतीत आमचे सोनोपंत अतिशय अज्ञानी आहेत. प्लेटोच्या तत्त्वज्ञानात झरीशपळवशी या संवादाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे हे प्रत्येकाला कबूल आहे. याच संवादांत प्लेटोने आपला खवशरी चा सिद्धान्त ठशीिलिश्रळल व अगोदरचे इतर संवाद यात जसा मांडला गेला होता तसा स्वीकारणे शक्य नाही याची कबूली दिली आहे. खवशरी चा सिद्धान्त प्लेटोने टाकून दिला असा याचा अर्थ नव्हे. परंतु त्यांत महत्त्वाचे फरफार केले व ते फरक इतके महत्त्वाचे होते की, त्याचे शवटचे संवाद झरीशपळवशी मध्ये केलेल्या फरफाराशिवाय समजणे शक्यच नाही. अगोदरच्या संवादांत प्लेटोने सर्व खवशर एकाच प्रकारच्या आहेत असा विचार गृहित धरला होता. झरीशपळवशी मध्ये हा विचार त्याने चुकीचा ठरविला व खवशरी मध्ये सुद्धा अंतिम भेद असू शकतो असे मान्य केले. ऋीरश्र आणि झीीशी असे खवशरी चे त्याने दोन प्रकार कल्पिले. या सर्व विवेचनात शिरणे प्रस्तुत लेखात शक्य नाही याबद्दल मला वाईट वाटते. परंतु झरीशपळवशी चे महत्त्व प्लेटोच्या तत्त्वज्ञानात कोणते हे जाणून घेण्याची ज्याची इच्छा असेल त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्रो. ऋळश्रशीीं ठूश्रश यांचे चळपव १९३९ मध्ये प्रसिद्ध झालेले दोन लेख वाचावे. याविषयी इतरांनी बरेच लिहिलं आहे. सुदैवाने याविषयींचे बरेचसे महत्त्वाचे लिखाण प्रो. ठ.ए. अश्रश्ररप यांनी हल्लीच र्डींवळशी ळप झश्रर्रीे चशींरहिूीळली

या ग्रंथात समाविष्ट केलेले आणि प्लेटोचे तत्त्वज्ञान म्हणजे काय चीज आहे हे वाचकांना या ग्रंथातील लेख वाचून थोडेबहुत समजून येईल व सोनोपंत हा इसम किती भुक्कड व बेअकली आहे हेही पण उमजेल.

## ‘ज्ञानदेव व प्लेटो’ ह्या ग्रंथाच्या निमित्ताने .

## कुठें प्लेटो, कुठें ज्ञानदेव आणि कुठें सोनोपंत

### उत्तरार्ध

**‘सोनोपंत, माझे तुम्हाला आव्हान आहे की, कुठेंही प्लेटोच्या तत्त्वज्ञानावर तुम्ही व्याख्यान द्यावे. मी तुमची उलटतपासणी करीन आणि जर पांच मिनिटांच्या अवधींत तुमचे तुमचें अज्ञान उघड्यावर आणलें नाही तर मी तत्त्वज्ञानावर आजन्म लिहिणार नाही......’**

**भारतीय तत्त्वज्ञानावर साक्षात्काराचा मुखवटा चढवून पसव्या बुवाबाजीच्या मागे भारतीय जनतेला ओढणाऱ्या भोंदू संतांना प्रा.ग.ना. लवंदे ह्यांनी सात्त्विक संतापाने दिलेले एक जळजळीत आव्हान!**

या सर्व विवेचनाचा सारांश एवढाच की, सोनोपंतांनी या आपल्या चिमुकल्या ग्रंथांत प्लेटोला ज्ञानदेवांच्या खाली ओढण्याचा जो अश्लाध्य प्रयत्न केला आहे तो निःसंशय बेअकलीपणाचा एक नमुना आहे याचा वाचकांना बोध व्हावा हे होय. प्लेटो हा ज्ञानदेवापेक्षा कनिष्ठ आहे असे जर खरोखरीच एकाद्याचे मत असेल तर त्यांत वावगे असे कांही नाही. परंतु तसे सिद्ध करतांना जे पथ्य सांभाळायला पाहिजे ते हे की, आपण निर्विकारबुद्धीने प्लेटोचा अभ्यास केलेला हवा व इथेच तर सोनोपंतांचा प्लेटोवर राग असण्याचे कारण म्हणजे प्लेटो हा भारतीय नाही हे तर खरंच. शिवाय सोनोपंतांच्या म्हणण्याप्रमाणे प्लेटो हा साक्षात्कारी तत्त्वज्ञानी नाही हे होय ज्ञानदेवांना ईश्वराचा साक्षात्कार झाला होता, त्यांना प्रत्यक्ष ब्रह्मज्ञान झालं होते. तसा

साक्षात्कार व तशा प्रकारचे ज्ञान प्लेटोला झाले नव्हते हे कारण प्लेटो हा ज्ञानेश्वरांपेक्षा खालच्या पातळीवरचा तत्त्वज्ञानी आहे हे सिद्ध करावयाला पुरेसे आहे असे सोनोपंतांचे आग्रहाचे सांगणे आहे. सोनोपंतांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे प्लेटो हा प्रचीतिवादी होता परंतु त्याला ईश्वराचा साक्षात्कार झालेला नसल्यामुळे त्याला प्रचीती आली नव्हती. खऱ्या तत्त्वज्ञान्याला ईश्वराचा साक्षात्कार झालेला असतो असे आमच्या सोनोपंतांचे व त्यांचे गुरु रामभाऊ रानडे यांचे मत आहे, ज्याला साक्षात्कार होतो तो जीव मुक्त होतो कारण त्याला आत्मज्ञान झालेले असतं. प्लेटोला आत्मज्ञान झालेले असते. प्लेटोला आत्मज्ञान झालेले नव्हते तो जीवमुक्त नव्हता. तो साक्षात्कारी नव्हता, आत्मज्ञान, जीव-मुक्ति, साक्षात्कार ही सर्टीफिकेट असल्याशिवाय तत्त्वज्ञानाची परीक्षा पास झालो असे कुणालाही म्हणतां येणार नाही. तत्त्वज्ञान्याला ईश्वरानं दर्शन द्यायला पाहिजे. तरच ते खरेखुरे तत्त्वज्ञान, प्लेटो हा आपला खवशरी चा आवडता सिद्धांत मांडण्यांत गुंतून गेला. पण Ideas म्हणजे कांही साक्षात्कार नव्हे, इतकेंच काय तर ती साक्षात्काराची प्राथमिक तयारी सुद्धां नाही. खवशरी चा सिद्धांत म्हणजे बौद्धिक कसरत. सोनोपंतांच्या मताप्रमाणे साक्षात्कार हा तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. परंतु ज्याला ते 'साक्षात्कार' म्हणतात तो साक्षात्कार म्हणजे तरी काय? त्याला सोनोपंत आपला गुरु रामभाऊ रानडे यांच्या शब्दांत सांगतात (पान १६७) की साक्षात्कार किंवा mysticism म्हणजे ईश्वराचे direct, immediate, intimate apprehension ज्याप्रमाणे आपण

एखादी वस्तू पाहिली म्हणजे त्या वस्तूचे आपले ज्ञान प्रत्यक्ष असते तसे - नेमके तसे- साक्षात्कारी पुरुषाचे ईश्वराचे ज्ञान असते. साक्षात्कारी इसमाच्या समोर ईश्वर प्रत्यक्ष उभा राहातो व म्हणतो कसा, 'काय सोनापंत, कसं काय? बरं चाललं आहे ना आपलं? काय म्हणते प्रकृति? ठीक, साक्षात्कारी पुरुषाचे व ईश्वराचे इतक्या जिव्हाळ्याचे नाते असते की, साक्षात्कारी पुरुषाच्या प्रत्येक लहानसहान गोष्टींत ईश्वराचे अस्तित्व जाणवत असते. ज्ञानदेवांनी रेड्याच्या तोंडून वेद वदविले याचे रहस्य असे कीं ईश्वरानेच आपणहून रेड्याच्या शरीरांत प्रवेश केला व या साक्षात्कारी संताला एका अडचणींतून वांचवले. खरेच या साक्षात्कारी संतांनी ईश्वराचा जेवढा छळ केला आहे तेवढा छळ ईश्वराच्या शत्रूने सुद्धां केला नसेल. एक ईश्वराला म्हणतो आपली भांडी घासा, दुसरा म्हणतो आपली वस्त्रे धुवून आणा, तिसरा म्हणतो दळून द्या व चौथा म्हणतो आपल्याला सदेह वैकुठाला घेऊन जा, आणि ईश्वर तरी बिचारा काय करणार? एकदां या संतांना दर्शन दिल्यानंतर त्यांनी सांगितलेले काम केल्याशिवाय ईश्वराला तरणोपाय नाही. कारण कांही झाले तरी ते साक्षात्कारी पऱुष. ज्ञानदेव हे प्लेटोपेक्षां श्रेष्ठ कां ........ अशा प्रकारचे साक्षात्कारी .......होते.'

**बिचारा साधासुधा प्लेटो -**

प्लेटो बिचारा साधासुधा, त्याला असला साक्षात्कार कुठून सुचणार? त्याने

Academy

काढली व दारावर पाटी लावली की ज्यांना गणिताची आवड असेल त्यांनीच या संस्थेत प्रवेश करावा. Peare, Prege Russell Whitehead, Wittgenstein वगैरे आधुनिक गणितशास्त्राचे अध्वर्यु तर्कशास्त्र हा गणिताचा पाया मानतात व गणिताची सर्व प्रमेये ही केवळ तर्कशास्त्राचा भाग आहेत असा दावा करतात. ही मतप्रणाली बरोबर आहे का चूक आहे याची विवरण इथे करण्याचे कारण नाही. प्लेटोची गणिताची मीमांसा अशीच असावी असा समज त्याच्या Republic संवादावरून होतो. ते काहीहि असो मुख्य मुद्‌दा असा की ........................... शास्त्राचा शिल्पकार होता, अतएव ज्ञानदेव ज्या अर्थाने साक्षात्कारी होते असे सोनोपंत सांगतात त्या अथाने प्लेटो साक्षात्कारी नव्हता हे उघड सत्य आहे. पण याच कारणामुळे प्लेटो हा ज्ञानदेवांपेक्षा खालच्या पातळीवरचा तत्त्वज्ञानी होता  असा कसा काय अर्थ निघतो हे कळायला मार्ग नाही. परंतु सोनोपंतांना तसे वाटते याला तुम्ही आम्ही व प्लेटो तरी काय करणार? वास्तविक तत्त्वज्ञानाचा आणि साक्षात्काराचा अर्थाअर्थी संबंधच येतो कुठे? शिवाय साक्षात्कारी पुरुष ओळखायचा कसा. साक्षात्काराचे असे कोणते व्यवच्छेदक लक्षण आहे की, अमका इसम/साक्षात्कारी आहे असे निश्चितपणे ओळखतां यावे. ज्ञानदेव हे साक्षात्कारी आहे असे निश्चितपणे ओळखतां यावे. ज्ञानदेव हे साक्षात्कारी होते म्हणजे नेमके काय होते? अरविंद घोष, रामभाऊ रानडे हे साक्षात्कारी होते हे ओळखायचे कसे? त्यांना प्रत्यक्ष ईश्वराचे दर्शन झाले होते हे सिद्ध कसे करावयाचे? साक्षात्काराचा मानदंड कोणता? तसे पाहिले तर आचार्य अत्र्यांच्या ‘तो मी नव्हेच’ नाटकांतला राधेश्याम या बुवाला साक्षात्कारी कां म्हणू नये? त्याची तर

शंकर, विष्णू या देवांबरोबर खाजगी बोलणी चालत. त्याचप्रमाणे आमचे पुण्याचे धुंडीराज विनोद यांचीही व्यास, वसिष्ठ यांच्याबरोबर खाजगी चर्चा चालते. ही सर्व मंडळी साक्षात्कारी समजावयाची की काय? तसे असेल तर कुणालाही हातभट्टीची नवटाक घेऊन साक्षात्कारावर आपला हक्क सांगता येईल. पु.ल. देशपांड्यांच्या बबडूला जर सोनोपंतांनी एक कार्ड टाकले तर तो पहिल्या धारेची पाठवून देईल व मग काय साक्षात्कारच साक्षात्कार. सोनोपंतांनी हा साक्षात्काराचा प्रयोग जरूर करून पाहावा अशी माझी त्यांना सूचना आहे.

**भारतीय तत्त्वज्ञानाची दुरवस्था** - या साक्षात्काराने आमच्या जीवनांत व त्यांतल्या त्यांत तत्वज्ञानांत जेवढी बुवाबाजी निर्माण केली आहे तेवढी कशानेही नाही. कुणीही उठावे व आपण साक्षात्कारी आहो, आपणांस ईश्वराचे दर्शन झाले आहे असे ठणकावून सांगावे व जनतेला फसवावे. धर्मांत अशी बुवाबाजी चालणे अपरिहार्य आहे. पण तत्त्वज्ञानांत असल्या बुवाबाजीचा प्रवेश होऊ देणे अत्यंत धोक्याचे आहे. परंतु भारतीय तत्त्वज्ञानाची शोककथा अशी की, त्यांत बुवाबाजीला प्राधान्य व महत्व प्राप्त झाले आहे. अरविंद घोषांचं कौतुक कां तर ते साक्षात्कारी होते म्हणून ते बुवा होते व ते इतके प्रसिद्ध बुवा होते की, त्यांनी लक्षावधी लोकांना झुलविले. रामभाऊ रानडे हे तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर. पण त्यांनी आपल्या उत्तरायुष्यात निंबाळला आश्रम स्थापला व बुवाबाजी सुरू केली व आपला असा एक भक्तगण निर्माण करून त्यांना उपदेश सांगण्याचा क्रम सुरू केला. एखाद्या तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाची काय ही शोककथा? पश्चात्यांत एकाहून एक मोठे तत्त्वज्ञानी होऊन गेले परंतु कोणी असा आश्रम स्थापला नाही. इंग्रजी, जर्मन, ग्रीक, फ्रेंच व त्याचप्रमाणे रशियाचे इतर तत्त्वज्ञानी यांनी आश्रम स्थापून अशी बुवाबाजी चालविली नाही. या

बुवाबाजीचा परिणाम असा की, भारतीय तत्त्वज्ञानाला जांत वगैरेच विकसित नाही. आपण आपले डोळ्यांना म्हणतो की, आमचे तत्त्वज्ञान सर्वश्रेष्ठ आहे. परंतु जांतय म्हणण्याला काय किंमत आहे हे जाणून घेणे आमच्या हिताचे आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानांत ही बुवाबाजीचा अभाव असल्यामुळे तर्कशास्त्राची, गणितशास्त्राची व इतर शास्त्रांची केवढी वाढ झाली. आणि आमच्याकडे आरंभ स्थापन साधनांना केवळ उपेक्षा करण्याची तर्कदृष्टी वारंवार शिल्लक राहिली. व्हाइटहेड रसेल यांच्या इंग्लिश Principia Mathematica सारखा ग्रंथ भारतात लिहिला जाणे शक्य आहे काय? आपण आपला केवळ साक्षात्कार आम्हाला, वैराग्य, निष्काम कर्म इत्यादी केवळ बोलतो व पाश्चात्य तत्त्वज्ञान हे केवळ बौद्धिक करत आहे असा अधिक्षेप करून आम्ही स्वतःचे समाधान करून घेतो. आमच्या विचारांना व आचारांना या साक्षात्काराची कीड लागली त्यामुळेच बुवाबाजी सुरू झाली. तिने तत्त्वज्ञानाचा बळी घेतला. भारतीय तत्त्वज्ञान म्हणजे निव्वळ बुवाबाजी अशीच पाश्चात्यांची आजवर समजूत आहे व ती खरी आहे.

वरील विचार सेनापतींनी याच्यावर विस्ताराने व जोरदार हल्ला करून प्लेटोचा अधिक्षेप केला, त्याचा प्रभाव वाचकांसमोर ठेवायला पाहिजे होते. परंतु त्याने उलट सेनापती हे शिष्य त्यांनी या प्रश्नांना प्लेटोच्या अधिक्षेप केला, त्याच्या तत्त्वज्ञानाचा उपहास केला व तत्कालीन परिस्थिती विषयीचा प्रश्न केला. कारण काय, तर प्लेटो हा बुवाबाजी करीत नव्हता. कां करावी? जो ईश्वर निर्माण करीत आहे, ज्याचे वर्णन सारखा प्लेटोने केले पण ते स्वरूप कशी शिष्य ॥ शब्दांशी केवळ कल्पना की । शी असा आमच्या दार्शनिकांच्या संबंधांत केले आहेत ते ईश्वर दर्शनाचे दिव्य कसे? त्याचा साक्षात्कार

होईल कसा? हा ईश्वराचा अपमान आहे. जे अंध आहेत ते सन्त ते होईल कसे? प्लेटो हा तत्त्वज्ञानी असल्याकारणाने साक्षात्काराची भाषा कधीच त्याला पण शक्य नव्हतं. वाईट एवढंच, आमचे सोनोपंत, प्लेटोचा अधिक्षेप करायला निघाले आहेत. या सोनोपंतांना तत्त्वज्ञान कशाशी खातात हे तरी कळले का? ज्या गृहस्थाने प्लेटोचे सर्व संवाद नजरेखालून घालण्याची तसदी घेतली नाही, ज्याने त्याच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला नाही, त्या सोनोपंतांसारख्या एका भिकारड्या माणसाने प्लेटोसारख्या सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञाचा अधिक्षेप करण्याचे साहस करावे असा मूर्खपणा केवळ सोनोपंतांनाच शोभून दिसे. माझे सोनोपंतांना आव्हान आहे की, त्यांनी केव्हाही प्लेटोच्या तत्त्वज्ञानावर व्याख्यान द्यावे किंवा निबंध वाचावा, मी त्यांची उलटतपासणी घेईन व जर का मी या सोनोपंतांचे अज्ञान पांच मिनिटांत उघडकीस आणले नाही तर मी तत्त्वज्ञानाविषयी आजन्म लिहिणार नाही व बोलणार नाही. आहे सोनोपंतांची तयारी? होऊन जाऊ द्या एकदा. पाहू या सोनोपंतांचा प्लेटोच्या तत्त्वज्ञानाचा काय अभ्यास आहे ते. म्हणे प्लेटो हा प्रचीतिवादी होता, तो साक्षात्कारवादी नव्हता. त्याच्या तत्त्वज्ञानाची उंची व खोली पाहून अशी होती सोनोपंतांसारख्या बुटक्या जीवाला प्लेटोच्या तत्त्वज्ञानाच्या महासागराची खोली व उंची काय कळणार? असो.

**दोन हात दूर राहा** – तेव्हा माझी सोनोपंतांना अशी विनंती आहे की, त्यांनी पाश्चात्य तत्त्वज्ञानापासून व त्यांतल्या त्यांत इंग्रजी, जर्मन, ग्रीक वगैरे तत्त्वज्ञान्यांपासून तर दूर राहावे. प्लेटोचे तत्त्वज्ञान समजण्याइतकी त्यांची बुद्धीची तयारी नाही. तेवढी त्यांची कुवत नाही. त्यांनी आपला शंकराचार्य गीता, उपनिषदे, ज्ञानेश्वरी यांच्या संबंधी काय बडबड करायची ती खुशाल करावी, त्याचे कोणालाही काही वाटणार नाही. परंतु या पाश्चात्य तत्त्वज्ञान्यांच्या वाटेस त्यांनी जाऊ नये. ते त्यांचा अधिकार नव्हे. खरं

म्हणजे, त्यांच्या या पुस्तकाची किंमत दीड रुपयाहून अधिक नाही. ज्यांना प्लेटोचे तत्त्वज्ञान ही काय चीज आहे हे समजून घ्यायची इच्छा असेल त्यांनी या पुस्तकाला स्पर्श सुद्धा करू नये. अतिशय भुक्कड पुस्तक आहे ते. हे पुस्तक प्रसिद्ध करणे म्हणजे पैशाचा चुराडा, शाईचा दुरुपयोग आहे. विद्यार्थ्यांनी तर या पुस्तकाकडे ढुंकूनही पाहू नये.

शेवटी सोनोपंतांना माझी कळकळीची विनंति आहे. इतर वाङ्मयसेवा खुशाल केली तरी चालेल, परंतु तत्त्वज्ञानाच्या प्रांती असली बुवाबाजी आणू नये, ते पाप त्यांनी करू नये. ज्ञानाचा प्रांत हा बुद्धीचा प्रांत आहे. त्यांत बुद्धि श्रेष्ठ आहे. तर्क त्यांचा आत्मा आहे. तेथे साक्षात्काराला जागा नाही. बुवाबाजी करायला तुम्हाला परमार्थी क्षेत्राचे दरवाजे सताड उघडे आहेत. तेथे हवे ते थैमान घाला. परंतु तत्त्वज्ञानाचे मंदिर या साक्षात्काराने विटाळू नका. तत्त्वज्ञानाबद्दल जर का त्यांना आदर असेल तर सोनोपंत, एवढे करावे. परमार्थाच्या विषयाची तुम्हाला शपथ आहे.

## प्लेटोसंबंधींच्या माझ्या ‘त्या’ लेखाबद्दल माझी भूमिका

एप्रिल महिन्याच्या १६ व १७ तारखांच्या ‘मराठ्यात’ ‘कुठे प्लेटो, कुठे ज्ञानदेव व कुठे सोनोपंत’ या मथळ्याखाली माझे दोन लेख प्रसिद्ध झाले होते. हे लेख प्रसिद्ध झाल्यावर शेकडो लोकांनी ‘मराठा’ कचेरीत व स्वतः माझ्या पत्त्यावर पत्रे पाठवून माझा निषेध व माझी प्रशंसा केली. अर्थात निषेधाचे प्रमाण प्रशंसेपेक्षा बरेच मोठे होते हे सांगणे आवश्यक आहे. अशा तऱ्हेची प्रतिक्रिया होती. आज शेकडो वर्षे जे संस्कार आमच्या मनावर झाले गेले आहेत. त्या संस्कारांना थोडासा जरी धक्का लागला गेला तरी जीव कासावीस होणे स्वाभाविकच हाते. भारतीय तत्त्वज्ञान,

गीता, शंकराचार्य यांच्यासंबंधीच्या ज्या रुढ कल्पना आपल्या समाजांत मूळ धरून राहिल्या आहेत त्यांना आव्हान देणे म्हणजे समाजाचा आपणावर रोष ओढवून घेण्यासारखे होते. अर्थात त्याबद्दल मला मुळीच खेद होत नाही. कुणी तरी हे कटुकर्तव्य करायला हवे होते. ज्यांनी ज्यांनी माझी प्रशंसा केली व माझा निषेध केला त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

**'ते' पत्र आलेच नाही.**

परंतु या गदारोळात ज्या एका पत्राची मी उत्सुकतेने वाट पाहात होतो ते पत्र मात्र एक महिना झाला तरी आलेले दिसत नाही. मी माझ्या लेखांत सोनोपंतावर काही आरोप केले होते व त्यांना आव्हान दिले होते. प्लेटोच्या तत्वज्ञानाचे अध्ययन तर राहोच, परंतु प्लेटोचे ग्रंथसुद्धा न वाचता सोनोपंतांनी प्लेटोचा अधिक्षेप केला होता असा माझा सोनोपंतांवर आक्षेप होता. माझे आव्हान स्वीकारण्याचे आज पत्र येईल, उद्या येईल याची मी तब्बल महिनाभर वाट पाहिली. कांही दिवसांपूर्वी माहीमचे डॉ.जावडेकर यांनी सुद्धा माझे आव्हान स्वीकारा अशी सोनोपंतांना विनंती केली होती. परंतु अजूनपर्यंत सोनोपंतांचे उत्तर नाही. वाचकांनी याचा अर्थ लावावा. परंतु, ज्यांनी सोनोपंतांच्या वतीने माझा निषेध केला आहे त्यांच्यावर आतां एक मोठी जबाबदारी आहे. त्यांनी तरी सोनोपंतांची समजून काढून माझे आव्हान स्वीकारण्याची त्यांना गळ घालावी. त्यांच्या निषेधाला जर कांही अर्थ असेल तर त्यांनी हे करावे. जर सोनोपंत माझे आव्हान स्वीकारणार नसतील तर ज्यांनी माझा निषेध केला त्याच्या निषेधाला कांहीच किंमत राहणार नाही. सदरांत जमा होतो. माझा निषेध करणाऱ्यांनी हे करावेंच.

**पार्श्वभूमि लक्षांत घ्या -**

मी माझ्या लेखांत सोनोपंतांची ज्या जळजळीत शब्दांत निर्भत्सना केली आहे, ती केली नसती तर बरे झाले असते असे माझ्या कांही स्नेह्यांनी मला प्रत्यक्ष सांगितले. त्यांच्या या सद्भावनेबद्दल मी आभारी आहे. परंतु त्यांनी माझ्या लेखामागची पार्श्वभूमि लक्षांत घ्यावी. सोनोपंत हे पंचवीस-तीस वर्षे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते. किती तरी विद्यार्थ्यांना त्यांनी प्लेटो शिकविला असेल. किती तरी विद्यार्थ्यांची त्यांनी प्लेटो या विषयाची परीक्षा घेतलो असेल. प्लेटोच्या तत्त्वज्ञानाची तोंडओळख सुद्धा नसलेल्या या सोनोपंतांनी या विद्यार्थ्यांवर काय अत्याचार केले असतील याची कल्पना करा व मगच मला दोष द्या. एखाद्या पहिल्या श्रेणीच्या विद्यार्थ्याला जर या सोनोपंतांनी आपल्या अज्ञानाच्या जोरावर अन्याय केला व त्या विद्यार्थ्याने जर वैतागाने आपल्या जीवाचा घात केला तर तुम्हाला काय वाटेल? एखाद्या डॉक्टरानं आपल्या वैद्यकीय अज्ञानामुळे जर एकाद्या रोग्याचा घात केला तर तुम्ही मला क्षमा कराल काय? एकाद्या तथाकथित डॉक्टराने अज्ञानामुळे एकाद्या रोग्याचा घात करणे व सोनोपंतासारख्या एका शिक्षकाने एका विद्यार्थ्याचा घात करणे यांत अंतर कुठे आहे? जो न्याय डॉक्टरला तोच न्याय सोनोपंतांना का लागू करू नये? मी सोनोपंतांवर कडक का लिहिले याची ही पार्श्वभूमि आहे. शिवाय सोनोपंत हे एक उपदेशक आहेत. समाजाची नीतिमत्ता वाढावी अशी त्यांना तळमळ आहे. त्यांनी तरी अधिक जबाबदारीनं वागायला नको होते का? सोनोपंतांनी अन्याय केला तर त्यांना क्षमा का

म्हणून? आमचे इथेंच चुकते, आम्ही चांगल्याला चांगले म्हणत नाही व वाईटाला वाईट म्हणत नाही. त्यामुळे चांगले जगत नाही व वाईट मरत नाही. 'परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्' हे गीतेतले वचन जर लक्षांत घेतले तर मला दोषी ठरवता येणार नाही.

**सोनोपंतांचा गौरव!**

शेवटी मला वारकरी लोकांविषयी दोन शब्द सांगणे जरूर आहे. सोनोपंत हे वारकरी पंथाचे अध्वर्यु असल्याने कांही वारकरी मला निषेधाची पत्रे पाठवीत असतात. पण या वारकरी लोकांना मला एवढेच सांगायचे आहे की, तुमचा आणि माझा कांहीच संबंध नाही. वारकरी पंथाबद्दल माझा द्वेष नाही उलट आदरच आहे. सोनोपंतांवर मी टीका केली ती ते वारकरी म्हणून नव्हे तर तत्त्वज्ञानी म्हणून, प्लेटोचे अभ्यासक म्हणून, पांडुरंगाचे उपासक म्हणून नव्हे, सानोपंतांनी जर प्लेटोचा अधिक्षेप केला नसता तर मी सोनोपंतांच्या पुस्तकाकडे ढुंकुनही पाहिले नसते. तेव्हा तुमचा माझ्यावरचा राग निरर्थक आहे. याचे कारण तुमची जी श्रद्धास्थाने असतील त्यांना मी मुळीच धक्का लावलेला नाही. इतकेच नव्हे तर साक्षात्कारावर जी मी टीका केली आहे ती धर्मांतल्या साक्षात्कारावर नसून तत्त्वज्ञानांतल्या साक्षात्कारावर धर्मात तुम्ही हवा तो साक्षात्कार चालवून घ्या. माझी त्याला आडकाठी नाही. तत्त्वज्ञानात मात्र साक्षात्काराला स्थान नाही. तत्त्वज्ञानात बुद्धीची उपासना चालते, चालली पाहिजे. तेव्हा माझा निषेध करण्याऐवजी या वारकरी लोकांनी सोनोपंतांकडे जाऊन त्यांना म्हणावे, 'मामासाहेब बघता काय व्हा पुढं!' व असे

म्हणून माझे आव्हान स्वीकारावयास त्यांना लावावे. त्यांतच त्यांना भूषण आहे व सोनोपंतांचा गौरव आहे.

* * *

भारतीय तरूणांचा बुद्धीभेद थांबवा

डॉक्टरेटची पदवी संपादन व लेल्या एका विद्वद्वर्यांचे 'कुठे प्लेटो, कुठे ज्ञानेश्वर आणि कुठे सोनोपंत' या शीर्षकाचे दोन लेख 'दैनिक मराठा' (दि.१७ आणि १८ एप्रिल १९६७) मधे प्रसिद्ध झाले होते. श्री.सोनोपंत दांडेकरांनी प्लेटो आणि ज्ञानेश्वर या विषयावर अलिकडेच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाचा परामर्श घेणं हा डॉक्टरसाहेबांचा हेतू आहे असं सकृतदर्शनी वाटतं. पण दोन्ही लेख वाचल्यावर खात्री पटते की डॉक्टरसाहेबांनी ही संधी भारतीय तत्वज्ञानाची आणि भारतीय विचारवंतांची जाणून बुजून मानखंडना करण्यासाठी वापरली आहे. त्यांनी लिहिलेले विचार किती निंद्य आहेत आणि सामान्य वाचकांच्या श्रद्धा डळमळीत करण्याचा हेतू कसा साध्य होत आहे तेच दाखवून देण्यासाठी मी त्यांना प्रत्युत्तर देण्याचं धाडस करतो आहे.

**दृष्टीकोन -**

एकाद्या गोष्टीकडे पाहण्याचे दृष्टीकोन माणसा-माणसागणिक बदलत असतात. जी गोष्ट किंवा वस्तू एकाद्याला चांगली वाटेल तीच वस्तू दुसऱ्याला वाईट दिसेल. पदार्थ तोच असतो. मग पाहणाऱ्यांच्या मतामधे अशी भिन्नता कां यावी? याला कारण म्हणजे त्या विशिष्ट वस्तूचं ज्ञान करून घेण्यासाठी व्यक्ती-व्यक्तींच्या ठिकाणी असलेली जिज्ञासा आणि चिकित्सक वृत्ति कमी-जास्त प्रमाणात असते. काही-काही वेळां माणसाचं पूर्व-ग्रह-दूषित मन त्या माणसांना त्या वस्तूचं सम्यक ज्ञान घडवून देण्याच्या मार्गात येतं. काही माणसांचा स्वभावच छिद्रान्वेषी असतो. अशा प्रकारची माणसं एकाद्या बाबतीत शुद्ध विचार करूच शकत नाहीत. सकाळची कोवळी

उन्हं बघून कुणाला वाटेल की पृथ्वीला सोन्याचा मुलामा दिलाय, कुणी म्हणेल की कुबेराचं सुवर्ण-भांडार प.टून पृथ्वीवर कोसळलंय! पण एका नवकवीला मात्र सकाळचं कोवळं ऊन बघून खांडुक आणि पूं या सारख्या किळसवाण्या गोष्टींची आठवण झाली. कवि(?) म्हणतो 'आकाशाचं खांडुक प.टलं आहे आणि ऊन म्हणजे त्या प.टक्या खांडकातून गळलेला पिवळा धमक पूं आहे.' ज्याची कल्पना शक्तीच नासलेली आहे त्याला असलाच प्रत्यय येणार!

शंकराचार्य, ज्ञानेश्वर माऊली, तुकाराम महाराज या विचारवंतांनी समृद्ध केलेलं आणि रामभाऊ रानडे, अरविंद घोष, विवेकानंद आणि लोकमान्य टिळक यांच्या सारख्या बुद्धिमंतांनी आणि कर्मयोग्यांनी वाखाणलेलं भारतीय तत्वज्ञान डॉक्टरसाहेबांना हिणकस वाटावं हा वर सांगितलेल्या खांडुक-पूं या प्रकारसारखा प्रकार आहे. डॉक्टर साहेबांनी भारतीय तत्वज्ञान आणि तत्वज्ञ यांच्या बाबतीत घेतलेली भूमिका ही त्यांच्या विकृत दृष्टीकोनाचा परिणाम आहे असं म्हटलं तर प ारसं वावगं होणार नाही!

**आकस बुद्धि -**

डॉक्टर साहेबांनी लिहिलेला लेख टीकाकाराच्या भूमिकेतून लिहीला नसून सोनोपंतांविषयीच्या व्यक्तिगत आकस बुद्धीने लिहीला आहे असे नाईलाजानं म्हणावं लागतं. डॉक्टरसाहेबांनी सोनोपंतांना लावलेली 'भुक्कड-मूर्ख' इत्यादी विशेषणं वाचली म्हणजे त्या आकस बुद्धीचा प्रत्यय येतो. टीकाकाराची किंवा ज्याला एकादं मत प्रस्थापित करायचं आहे त्याची भूमिका केवळ नि:पक्षपाती असली पहिजे असं डॉक्टरसाहेब स्वतः म्हणतात. निर्विकार

बुद्धी ही जर तौलनिक अभ्यासाचा पाया असेल तर तशी निर्विकार (निःपक्षपाती) बुद्धी डॉक्टर साहेबांनी (सोनोपंतांच्या) पुस्तकाचा परामर्श घेताना वापरली नाही असं निश्चयानं म्हणावं लागतं. डॉक्टरसाहेब प्लेटोचे निस्सिम भक्त आहेत. त्यांच्या त्या भक्तीला सोनोपंतांच्या पुस्तकानं डिवचल्याबरोबर डॉक्टरसाहेब चवताळून उठले आणि आद्य शंकराचार्यांपासून सर्व भारतीय विचारवंतांवर चिखल फेक करायला सुरूवात केली. निर्विकार बुद्धीचे गोडवे गाणारे डॉक्टरसाहेब विकारवश झालेले पाहून वाचकांचं मात्र भरपूर मनोरंजन झालं! सोनोपंतांच्या पुस्तकात मांडलेल्या विचारांच्या चुका निर्विकार बुद्धीनं दाखवता आल्या असत्या. नाही म्हणायला नको म्हणून दोन ठिकाणचे दोष डॉक्टरसाहेबांनी दाखवले आहेत. उरलेली सर्व जागा भारतीय तत्वज्ञांची आणि तत्वज्ञानाची अवहेलना करण्यात खर्च केली आहे. 'शंकराचार्य आणि इतर आचार्य हे आचार्य अत्रे यांच्या 'तो मी नव्हेच' या नाटकामधल्या राधेश्याम महाराजांप्रमाणं पहिल्या धारेची नवटाक झोकून साक्षात्काराविषयी बरळत बसणारे भोंदू होते' आणि 'गीतेमधे तत्वज्ञानापेक्षा बुवाबाजीच जास्त आहे' अशी अत्यंत नीच पातळीला जाऊन टीका करणारे डॉक्टरसाहेब तशी विधानं निर्विकार बुद्धीनं आणि निःपक्षपणे करत असतील असं ठरवण्याचं धारिष्ट कुणीहि-ते स्वतः सोडले तर - कुणीही करणार नाही.

**मिरासदारी ? -**

व्यक्तिगत आकस बुद्धीचा कळस डॉक्टरसाहेबांनी त्या पुढे गाठला आहे. 'सोनोपंतांना तत्वज्ञान कशाशी खातात हे तरी माहीत आहे कां?' असा सवाल त्यांनी सोनोपंतांना विचारला आहे. त्याचाच अर्थ तत्वज्ञान कशाशी खातात हे डॉक्टरसाहेबांना माहीत असावं. त्यांनी ते (बकऱ्याच्या सागुतीबरोबर) खाल्लं असावं. पण ते त्यांना पचलं नसावं. म्हणूनच तत्वज्ञाला न शोभतील अश्या शिव्यांचं मल-मूत्र विसर्जन ते भारतीय तत्त्वज्ञान आणि तत्वज्ञांवर करत सुटलेत. डॉक्टर साहेबांना स्वतःची आणि पाश्चात्य तत्वज्ञांची उंची एवढी वाटते की आमच्या कडले आचार्य त्यांना बुटके वाटतात. पुढे जाऊन डॉक्टर साहेब म्हणतात- 'सोनोपंतांना माझी अशी विनती आहे की, त्यांनी पाश्चात्य तत्वज्ञांपासून आणि त्यातल्या त्यात प्लेटो, अरिस्टॉटल, कांट वगैरे तत्वज्ञात्यापासून फार दूर रहावे' डॉक्टर साहेबांनी दिलेला हा इशारा गमतीचाच आहे. त्या तीन पाश्चात्य तत्वज्ञांनी डॉक्टर साहेबांना त्यांच्या त्यांच्या तत्वज्ञान भांडाराचे रक्षक नेमले आहे काय ते कळायला मार्ग नाही! कां पाश्चात्य तत्वज्ञानाचे क्षेत्र डॉक्टरसाहेबांची मिरासदारी आहे? तत्वज्ञानाच्या क्षेत्रात बुवाबाजी नको असं सांगणारे डॉक्टरसाहेब त्याच क्षेत्रात मिरासदारी आणू पहात आहेत!!

**साक्षात्कार -**

जे पटवून घेण्याचा प्रयत्न केलेला नाही त्या गोष्टीचा उपहास करणं एवढा एकच मार्ग माणसास उपलब्ध असतो. श्री.सोनोपंतांच्या पुस्तकाच्या निमित्ताने डॉक्टरसाहेबांनी तोच मार्ग अवलंबिला आहे. ते साक्षात्कारावर घसरलेत-खूप घसरलेत! 'साक्षात्काराची कल्पना ही भारतीय

तत्वज्ञानाला लागलेली कीड आहे' असं त्यांना वाटतं. गुरुवर्य रानडे यांनी साक्षात्काराची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे, 'ईश्वराचे उ्ळीशलीं, खाशवळरींश, ळपींळारींश- अीींशिहशपीळेप म्हणजे साक्षात्कार!' पण डॉक्टरसाहेबांनी ती व्याख्या वाटेल तशी मुरगळून त्यातून त्यांना सोईस्कर असा अर्थ काढला आहे. तो अर्थ असा की, 'एकादी वस्तू आपण पाहिली म्हणजे त्या वस्तूचे आपले ज्ञान प्रत्यक्ष असते.' एकाद्या गोष्टीचे ज्ञान होण्यासाठी ती वस्तू साकार असलीच पाहिजे किंवा ती डोळ्यांना दिसलीच पाहिजे असं डॉक्टरसाहेबांना म्हणायचं आहे कां? वर जे चार इंग्रजी शब्द दिले आहेत त्यांचा शब्दकोषातला अर्थ गृहित धरला तरी डॉक्टरसाहेब म्हणतात तसा अर्थ निघत नाही. कारण उ्ळीशलीं या शब्दाचा अर्थ 'स्पष्ट' किंवा 'माध्यमाशिवाय' असा आहे, आणि खाशवळरींश याचा अर्थ सुद्धा 'तात्कालिक' किंवा 'ुळींहेीीं ळपींशीींशिपळपस ाशवळीा' असाच आहे. अशा परिस्थितीत 'ईश्वर साक्षात्कारी पुरूषासमोर उभा राहतो, आणि त्याच्याशी हवापाण्याच्या गप्पा मारतो' इत्यादी अर्थ डॉक्टर साहेबांनी कुठून काढला? पण तसा आभास निर्माण केल्याशिवाय भारतीय तत्वज्ञानाची टिंगल किंवा उपहास करण्याचा डॉक्टरसाहेबांचा हेतू साध्य झाला नसता.

भक्तियोगाच्या सहाय्यानं परमेश्वराचं ज्ञान प्राप्त करून घेणारी जी अनेक संतमंडळी भारतात-विशेषतः महाराष्ट्रात होऊन गेली त्यांच्या सहाय्याला ईश्वर धावून आला अशा प्रकारच्या अनेक कथा-दंतकथा भारताच्या प्रत्येक प्रांतात प्रचलित आहेत. त्या कथांमागील (चमत्कारामागील) शास्त्रीय उपपत्ती समजून घेण्याइतकी बौद्धिक पातळी ज्यांची उंचावलेली नाही अशा सामान्य जनांच्या कल्पनेलाच तत्वज्ञान समजून डॉक्टरसाहेब टिंगल करत सुटलेत

याचं आश्चर्य वाटतं! तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले या सामान्य जनांच्या रूढ कल्पनेची शास्त्रीय उपपत्ती श्री.कृ.के.कोल्हटकर यांनी त्यांच्या 'भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातंजल योग-दर्शन' या ग्रंथात पृष्ठ ६६५ वर दिली आहे. ते म्हणतात-'इंद्रायणीच्या वाळवंटात भजनानंदात त्यांची (तुकाराम महाराजांची) वृत्ती सर्व बाह्य वृत्तींचा निरोध घडून केवळ आत्माकार बनली होती. म्हणजे ते त्यावेळी व्युत्यानावस्थातीत तुर्यगाभूमीवर गेलेले होते. अशा समयी जीवनमुक्ती सुखोपभोगाने प्रारब्धाकर्माचा क्षय होतांच त्यांच्या स्थूल सूक्ष्म देहातील त्रिगुणांची परिणामक्रम समाप्ती होऊन त्यांचा प्रतिप्रसव होण्याचा क्षण समीप आला. जेव्हा हा क्षण प्राप्त झाला तेव्हा त्यांच्या सूक्ष्म देहातील सतरा तत्वे स्वकारणात लीन झाली आणि प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान ह्या पंचविध मुख्य प्राणवृत्तींच्या तीव्र संवेगमूलक विलयाबरोबर त्याच क्षणी' त्यावर अवलंबून असलेले नाग, कूर्म, कृकर, देवदत्त आणि धनंजय या पांच उपप्राणांच्या वृतिसुद्धा स्वकारणीभूत रजोगुणांत अंतर्धान पावल्या. मृत शरिरात स्थौल्य, आकार इ. धर्म धनंजय ह्या उपप्राणवृत्तीमुळे टिकून राहतात. पण ह्या ठिकाणी मुख्य प्राणवृत्ती आणि गौण उपप्राणवृत्ति या सर्वांचा प्रविलय एकाच क्षणी झाल्यामुळे स्थूल देहांतील पांच भौतिक परमाणूंना मृत शरिराने एकत्र ठेवणारी कोणतीच शक्ती उरली नाही. त्यामुळे त्या परमाणूंचा प्रविलय समष्टियूत स्थूल भूतांत त्याच क्षणी झाला आणि महाराजांचे शरीर पूर्वलक्षी भक्तांस दिसत होते, ते उत्तरक्षणी एकाएकी दिसत नाहीसें झालें. आणि भक्तगणांना वाटले की, ज्याअर्थी महाराजांचे शरीर एकाएकी दिसेनासें झालें त्या अर्थी महाराज सदेह वैकुंठाला गेले आणि लक्षणिक अर्थानं ती कल्पना खरीही होती' सामान्यजनांचं सोडाच, पण डॉक्टरसाहेबांसारखा विद्वानही शास्त्रीय

उपपत्तीकडे पाठ फिरवून आणि सामान्यजनांच्या कल्पनेलाच तत्वज्ञान समजून त्याची अवहेलना करू लागता ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे!

साक्षात्कारासंबंधानं डॉक्टर साहेबांनी आणखी एक प्रश्न उपस्थित केला आहे तो म्हणजे 'साक्षात्कारी माणूस ओळखावा कसा' त्या प्रश्नाचं उत्तर भगवद्गीतेच्या अध्याय २-श्लोक ५५ ते ६४ मधे दिलं आहे. त्या श्लोकात सांगितलेली स्थितप्रज्ञाची लक्षणे, साक्षात्कारी अथवा ज्याला परमतत्वाचे म्हणजे ईश्वराचे सम्यक ज्ञान झाले आहे अशा व्यक्तीची लक्षणे आहेत असं समजायला हरकत नाही. प्रज्ञा स्थिर झाल्याशिवाय ब्राह्मी स्थिती प्राप्त होणं केवळ अशक्य! 'वीत राग भय क्रोधः, निर्ममो निरहंकारः, दुःखेषुउद्विग्न मनः, आत्मन्येवात्मना तुष्टः' इत्यादी स्थितप्रज्ञाचे गुण ज्याने आत्मसात केले आहेत आणि म्हणून ज्याला परमेश्वराच्या सम्यक ज्ञानाचा लाभ झाला आहे, अशा व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातून या लक्षणांचा प्रत्यय सामान्यजनांना येत असतो. पण ही लक्षणे गीतेत सांगितलेली, आणि डॉक्टर साहेबांच्या मतें गीतेमधे तत्वज्ञानापेक्षा बुवाबाजीच जास्त आहे. मग ती लक्षणे डॉक्टर साहेबांना मान्य कशी होणार? साक्षात्कारी पुरूषाची व्यवच्छेदक लक्षणं विचारण्याची डॉक्टरासाहेबांची जिज्ञासा वर दिलेल्या उत्तराने उपशमित होणार नाही. कारण त्यांना वेगळी लक्षणं हवी आहेत. एकाद्या माणसाला प्लेग झाला तर त्याच्या काखेत किंवा जांघाडात गांठ येते. त्यावरून सांगता येतं की तो प्लेगचा रोगी आहे. त्या प्रमाणं साक्षात्कारी इसमाच्या काखेत गांठ आली असती किंवा त्याच्या अंगावर विविध रंगाचा पुरळ उठला असता तर बरं झालं असतं. डॉक्टरसाहेबांना दाखवता आलं असतं कि, 'तो पहा, तो पहा साक्षात्कारी इसम. त्याच्या अंगावरला पुरळ हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे!!'

आजमितीला एकादा साक्षात्कारी संत हयात असता तर बरं झालं असतं. म्हणजे त्या संतानं , ज्या प्रमाणं ज्ञानेश्वर महाराजांनी रेड्याच्या तोंडून वेद वदविले त्याप्रमाणं डॉक्टरसाहेबांच्या तोंडूनच साक्षात्कारी इसमाची व्यवच्छेदक लक्षणं वदवून घेतली असती!!

**बुवाबाजी ?**

थोड्याफार ज्ञानाच्या बळावर श्रद्धाळू माणसांना फसवून, त्यांना लुबाडून, स्वतःच्या विलास-उपभोगाची साधनं निर्माण करणारा तो 'बुवा' आणि विषयोपभोगाच्या उद्‌देशानं करण्यात येणाऱ्या निरनिराळ्या चेष्टा म्हणजे 'बुवाबाजी' असाच त्या दोन शब्दांचा अर्थ प्रचलित आहे. डॉक्टरसाहेबांनाही तोच अर्थ अभिप्रेत असावा. त्या दृष्टीनं बघायला गेलं तर शंकराचार्य, इतर आचार्य, संत ज्ञानेश्वर किंवा तुकाराम महाराज यांनी असली थिल्लर सोंगं केली, किंवा समाजाला कुमार्गाला लावलं (किंवा सामान्य माणसाला फसवून गाठोडं जमा केलं) असं डॉक्टरसाहेबांना खरंच वाटतं कां? ज्ञानेश्वर माऊली आणि तुकाराम महाराज या संतांच्या तथाकथित बुवाबाजीचा कस, स्वतःला ज्ञानी म्हणवणाऱ्या तात्कालिक पंडितांनी लावलाच होता! त्या पंडितांनी या विचारवंतांचा-साक्षात्कारी पुरूषाची व्यवच्छेदक लक्षणं जाणून घेण्यासाठी असेल इतका अनन्वित छळ केलाच, पण त्या गोष्टीला आज इतकी शतकं लोटली तरीही सालोमालो, अंबाजी यांच्या रांकेत शोभून दिसतील असे डॉक्टरसाहेबांसारखे प्रकांड पंडित डोकं वर काढून संत-विचारवंतांवर दुगाण्या झाडतच आहेत! पण सहस्त्रावधी वर्षांपासून चालत

आलेली ही उज्वल आणि श्रेष्ठ ज्ञान परंपरा, जी परकीयांच्या अविरत आक्रमणांना आणि पाशवी विध्वंसक वृत्तीला तोड देऊन ताठ उभी राहिली ती स्वकीयांच्या दिवाळखोर टवाळीपुढं पूर्वी कधी नमली नाही या पुढेंही नमणार नाही. या टवाळखोरीला कै.लोकमान्य टिळकांनी पूर्वीच उत्तर देऊन ठेवलंय. ज्या तत्वज्ञानाच्या अभिनिवेशानं, डॉक्टरसाहेबांनी भारतीय तत्वज्ञानाची टिंगल चालवली आहे त्या विषयी कै.लो. टिळक म्हणतात - 'कान्ट प्रभृती काही पाश्चात्य तत्वज्ञांचे सिद्धांत, आमच्याकडील वेदान्त शास्त्राशी पुष्कळ जुळत चाललेत हे लक्षात घेतलं म्हणजे आधिभौतिक शास्त्राची हल्ली इतकी प्रगती तेंव्हा झालेली नसतांनाही, वेदान्तातील सिद्धांत, अंतःदृष्टीने पार प्राचीन काळी (ज्यांनी) शोधून काढले, त्यांच्या अलौकिक बुद्धिवैभवाचे आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. आणि आश्चर्यय नव्हे तर आपणांस त्याचा अभिमानही वाटला पहिजे' (गीता रहस्य, आवृत्ती ७, पृष्ठ १४०) लोकमान्य म्हणतात तसा अभिमान तर राहोच पण डॉक्टरसाहेबांना भारतीय विचारवंतांच्या अलौकिक बुद्धीवैभवाचं साधं कौतुकही वाटत नाही! एवढंच काय, पण जिथे शंकराचार्यांसारखे बुटके विचारवंत आणि गीता, उपनिषदांसारखे बुवाबाजीनं बरबटलेले तत्वज्ञान ग्रंथ निर्माण झाले त्या या भारतभूमीत मी व्यर्थ जन्मास आलो अशी खंत डॉक्टरसाहेबांना वाटली असेल तर तेही सयुक्तिकच आहे!!

भारतीय संत, विचारवंतांना बुवाबाजीच करायची असती तर इतर धर्मात निर्माण झालेल्या महापुरूषाप्रमाणं त्यांनीही स्वतःला ईश्वराचं प्रेषित म्हणवून घेऊन, त्यांच्या मध्यस्थीनं ईश्वरप्राप्ती सहज-साध्य करून ठेवली असती. पण तुकाराम महाराजांनी, 'नाही देवापाशी मोक्षाचे गाठोळे । आणून निराळे द्यावे हाती। इंद्रियांचा जय साधूनिया, मन । निर्विषय कारण असे तेथे।।' (गाथा,

२३१५, देवस्थान संस्थान) असा उपदेश करून माणसाला मोक्ष प्राप्तीचा बुद्धिनिष्ठ मार्ग दाखवून दिला. तुकाराम महाराजांना बुवाबाजीचा दोष चिकटवतांना डॉक्टर महाशयांनी वर उल्लेखिलेली आणि त्या सारख्या अनेक ओव्याकडं (जाणून-बुजून) दुर्लक्ष केलं आहे.

**बुद्धि-निष्ठ -**

एकाद्याला एकादी गोष्ट पटली नाही म्हणजे 'आपल्या बुद्धीला नाही पटत ते' असं म्हणून वेळ मारून नेण्याची प्रथा अलिकडं पडली आहे. एकादी गोष्ट एकाद्याला न पटणं हा दोष त्या गोष्टीचा नसतो तर त्या माणसाचा असतो. बरं, बुद्धी ही चीजच अशी आहे की जी व्यक्ती-व्यक्ती गणिक आपली पातळी बदलते. त्या पातळीनुसार ती व्यक्ती ज्ञान ग्रहण करीत असते. पण म्हणून ज्ञान ग्रहणाचा बुद्धी हा एकमेव मार्ग आहे असं म्हणणं धाडसाचंच आहे. त्यावर उपाय म्हणजे श्रद्धा! आपल्या पेक्षा वयानं, अनुभवानं आणि बुद्धीनं श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीनं एकादी गोष्ट सांगितली म्हणजे ती योग्य असली पाहिजे आणि आपण ती मान्य केली पाहिजे अशा ज्ञानग्रहणाच्या भूमिकेला श्रद्धा म्हणता येईल. तर्कशास्त्रात याला 'आप्त-वचन-प्रमाण' असं म्हणतात. गणितासारख्या शास्त्रात-जिथं खरं तर श्रद्धेला स्थान नाही-त्या शास्त्राचं शिक्षण घ्यायला सुरूवात करतांना काही गोष्टी शिक्षक सांगतो म्हणून मान्य करून पुढं जावं लागतं. (कधी कधी गृहीत धरलेल्या 'क्ष' ची किंमत कळायला आयुष्यभर खटपट करावी लागते.) असं जर आहे तर भारतीय तत्वज्ञानाच्या बाबतीतच हे बुद्धिवादी लोक खवळून कां उठतात? यांचा बुद्धीवाद किती पोकळ आहे त्याचं साधं उदाहरण देतो. परमेश्वरांविषयी प्लेटोनं मांडलेली कल्पना

डॉक्टर साहेबांना पटते. पण परमेश्वर भक्ताच्या हांकेला धावून येत असेल ही कल्पना मात्र पटत नाही. कारण काय? तर एक गोष्ट त्यांच्या बुद्धीला पटते, दुसरी पटत नाही. दुसरी पटत कां नाही?..... छेऽछेऽ असा प्रश्न विचारायचाच नाही. कारण त्यांच्या बुद्धीला ते पटत नाही. उलट भारतीयांच्या बुद्धीला परमेश्वर भक्तांच्या हाकेला धाऊन येतो ही गोष्ट पटली तर ती मात्र बुवाबाजी!! कारण काय? हाहि प्रश्न अगांतुकच! अहोऽ, तो शास्त्रीय सिद्धांत नव्हे! ती नवटाक झोकून केलेली बाष्कळ बडबड!!

तात्पर्य एवढचं की बुध्दिनिष्ठेने एक जगड्व्याळ निर्माण त्या पांघरूणाखाली काही लोक आपली अश्रद्धा दडवूं पाहतात. बुद्धीनिष्ठेचा असला अहंगंड निर्माण करून हे बुद्धिवादी समाजाचे अकल्याण करीत आहेत. भारतीयांनी बुद्धीची उपासना कधी दुर्लक्षित केली नाही. पण जे त्या बौद्धिक पातळीपर्यंत पोहोचे शकणार नाहीत त्यांच्यासाठी श्रद्धानिष्ठ भक्ति-मार्ग पण घालून दिला. पण तथाकथित बुद्धिवाद्यांना ती बुवाबाजी वाटते आणि त्यातूनच मग 'राजकारणात आणि शिक्षण क्षेत्रात प्रतिष्ठेच्या स्थानी असलेल्या कांही मूर्ख व काही लुच्चा लोकांनी भारतीय तत्वज्ञान श्रेष्ठ प्रतीचं आहे असा खोटा समज प्रसृत केला आहे.' असली बाष्कळ अनुमानं काढण्याचा प्रसंग त्यांच्यावर येतो.

**धर्म आणि तत्वज्ञान -**

डॉक्टरसाहेबांनी एक महिन्यानंतर, आपल्या त्या लेखाची पार्श्वभूमी, आणखी एक लेख लिहून स्पष्ट केली आहे. त्या नव्या लेखातील दोन विधानाकडं मी वाचकांचं लक्ष वेधू इच्छितो.

डॉक्टरसाहेब म्हणतात- ''मी साक्षात्कारावर जी टीका केली आहे ती धर्मातल्या साक्षात्कारावर नसून तत्वज्ञानातल्या साक्षात्कारावर केली आहे.'' वरवर पाहू जाता डॉक्टरसाहेबांचं हे म्हणणं पटतं. पण वास्तविक दृष्टीनं पाहिलं तर डॉक्टरसाहेब तसं स्पष्टीकरण देऊन आपलं पूर्वीचं विधान 'साक्षात्कार ही भारतीय तत्वज्ञानाला लागलेली कीड आहे' सिद्ध करू पहात आहेत. पण अशी समजूत तरी कां व्हावी? याचं साधं आणि सोपं कारण असं आहे की पाश्चात्य तत्वज्ञान आणि त्यांचा धर्म यांच्यात तशी सीमारेषा किंवा फरक दिसतो तसा फरक भारतीय धर्म आणि तत्वज्ञान यांमधे दिसत नाही. भारतीयांच्या धर्म या शब्दामागल्या कल्पना, पाश्चात्यांच्या धर्म (ठशश्रळसळप) या शब्दामागल्या कल्पनां इतक्या कोत्या नाहीत. भारतीयांच्या धर्म मानवी व्यवहाराच्या मुळापर्यंत पोहोचला आहे. परिणामतः भारतीयांचं तत्वज्ञान हाच त्यांचा धर्म आणि धर्म हेच तत्वज्ञान झालं आहे! मनुस्मृती हा धर्म ग्रंथ समजला जातो. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी अध्याय समाप्ति सूचित करण्यासाठी 'इति मानवे धर्मशास्त्रे (अमुक अमुक) अध्यायः' असं पद घातलेलं आढळतं. पण धर्मशास्त्र असूनही त्यात केवळ ईश्वर आणि त्याची उपासना या संबंधीच विचार केला नसून सृष्टीच्या उत्पत्तीपासून आत्मज्ञानापर्यंत सर्व विषयांचा उहापोह केला आहे. नीतिशास्त्र, राज्य-शासन, न्याय, कायदा, समाजशास्त्र इत्यादी अनेक विषय चर्चिले आहेत. याचाच अर्थ असा की ईश्वर प्राप्तीचं एक निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्याच्या सिद्धीसाठी मानवी व्यवहाराच्या सर्व क्षेत्रांत आदर्शवत् ठरतील अशी चांगली चांगली तत्वं एकत्रित करून भारतीयांनी त्याला 'धर्म' हे नाव दिलं आहे. धर्म हेच आमचं तत्वज्ञान आणि तत्वज्ञान हाच आमचा धर्म असं जे विधान वर केलं आहे ते याच अर्थानं. समाज सुसंघटित आणि पापभीरू

असल्यानं ज्येष्ठांनी सांगितलेली तत्वं, स्वतःच्या कल्पित बुद्धीवादाच्या बळावर चिवडत बसण्याची गरज भारतीयांना कधीच भासली नाही! भारतीय तत्वज्ञान आणि धर्म यांची अशा प्रकारची एकवाक्यता लक्षात न घेता जर कुणी शिवराळ टीका करू लागला तर त्याला जाब विचारण्याचा अधिकार प्रत्येक भारतीयाला आहे!

आपली भूमिका स्पष्ट करतांना डॉक्टरसाहेबांनी आणखी एक विधान केलं आहे. ते म्हणतात 'सोनोपंतांनी जर प्लेटोचा अधिक्षेप केला नसतां तर सोनोपंताच्या पुस्तकाकडं ढुंकूनही बघितलं नसतं' डॉक्टरसाहेबांच्या या स्पष्टीकरणाच्या आधारे एक प्रश्न त्यांना विचारावासा वाटतो, की प्लेटोच्या अधिक्षेपाचं परिमार्जन एवढाच जर मर्यादित होता तर गु.रानडे, अरविंद घोष यांचं चारित्र्य हनन करण्याची आणि आद्य शंकराचार्य, इतर आचार्य आणि गीता उपनिषदांसारख्या तत्वज्ञान ग्रंथावर देमार टीकेची कुऱ्हाड उचलण्याचं काय कारण? आणि अशी टीका करतांना डॉक्टर साहेबांनी आव मात्र 'परित्राणाय साधूनां, विनाशायच दुष्कृताम्' अवतार घेणाऱ्या परमेश्वराचा आणला आहे. गीतेतल्या त्या वचनावर डॉक्टरसाहेबांचा खरोखरच विश्वास असेल आणि साधूजनांच्या संरक्षणासाठी अवतार घेणाऱ्या परमेश्वरानं उद्याच अवतार घेतला तर डॉक्टर साहेबांची काय अवस्था होईल त्याचा त्यांनीच विचार करावा. सूज्ञास अधिक सांगणे न लगे!

जबाबदारी कुणावर?

भारतीय तत्वज्ञान, शंकराचार्य, गीता, उपनिषदं या विषयी डॉक्टरसाहेबांनी केलेली विधानं पूर्ण जबाबदारीनं केली आहेत असा निर्वाळा त्यांनी स्वतःच दिला आहे. तेंव्हा त्यांना हवं असलेलं पत्र आलं किंवा न आलं तरीही 'भारतीय तत्वज्ञानावर 'क्ष' किरण टाकण्याची जबाबदारी' त्यांनी पूर्ण करावी. आमच्या सारख्यांना प्लेटोचं तत्वज्ञान जळलं, खाक झालं तरी त्याचं सोयर सुतक पाळण्याची गरज नाही. आमच्या श्रद्धांना होरपळवण्याचा प्रयत्न करणाराला मात्र आम्हीच जाब विचारला पाहिजे. तसा जाब विचारायला प्लेटोच्या गोत्रातला कुणी उभा राहील अशी शक्यताच नाही. गीता रहस्य लिहूनही कै. लोकमान्यांना गीतेतल्या ज्या रहस्याचा उलगडा झाला नाही ते रहस्य डॉक्टरसाहेबांनी उलगडून दाखवावं, सगळ्या उपनिषदांवर भाष्य करावं; शंकराचार्यांच्या शरीर भाष्यावर खऱ्या अर्थानं टीका करावी; सुरेश्वराचार्यांच्या मानसोल्लाबाबत डॉक्टरसाहेबांच्या मनांत उठणाऱ्या उर्मी त्यांनी दाबून टाकू नयेत! आणि डॉक्टरसाहेबांना हे महान कार्य 'याचि देही याचि डोळा' करता यावं म्हणून परमेश्वरानं त्यांना उदंड आयुष्य द्यावं अशी आम्हा (निर्बुद्ध) भारतीयांची ईश्वर चरणी प्रार्थना आहे!!

**क्षमा –**

वास्तविक माझ्यासारख्या सामान्य माणसानं या वादात पडण्याची जरूरी नव्हती. डॉक्टरसाहेबांचं तत्वविवेचनाचं आव्हान स्वीकारण्याची माझी पात्रताहि नाही. कारण माझ्या

नावापुढं पी.एच.डी. सारखी उपाधी नाही. म्हणून डॉक्टरसाहेबांना आणि हा लेख वाचणाऱ्यांना माझी विनंती आहे की मी कुठं मर्यादा ओलांडली असली तर मला माफी द्यावी.

भारतीय तत्वज्ञान श्रेष्ठ प्रतीचं ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करण्यासाठी मी हा लेख लिहिलेला नाही. कारण स्वयंसिद्ध गोष्ट पुन्हा सिद्ध करावी लागत नाही. मला फक्त एवढंच दाखवून द्यायचं होतं की भारतीयांचा धर्म आणि तत्वज्ञान म्हणजे देमार टीकेचा शिमगा आणि शिव्यांची धुळवड साजरी करण्यासाठी मिळालेलं मोकाट रान नाही!! आणि तसा जर कुणी समज करून घेतला असेल तर त्याला आळा घालण्यासाठी प्रत्येक भारतीय सदैव सिद्ध आहे. कारण तुकाराम महाराजांसारखा संत सुद्धा शिवराळपणाविरुद्ध खवळून उठून इशारा देतो 'भले तो देऊ कासेची लंगोटी । नाठाळाचे माथी देऊ काठी।।'

* * *